विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | सद्धर्म : त्रैमासिक |
| संस्थापक | : | गुंडोपंत, हरिभक्त |
| संपादक | : | डॉ. विजय वा. बेडेकर |
| प्रकाशक | : | अनंत विनायक धोरे |
| प्रकाशन वर्ष | : | २०१८ |
| वर्ष | : | त्रेपन्नावे |
| अंक | : | दुसरा |
| पृष्ठे | : | ३२ पृष्ठे |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या**

**"ग्रंथालय" प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१८**

**गणपत्रिका क्रमांक : १९६**

Registered with the Registrar of News-paper for India, under R.N. 20770/71

सद्धर्म प्रकाशन

संस्थापक
गुंडोपंत हरिभक्त

वार्षिक ऐच्छिक देणगी
किमान ७५ रुपये

दीर्घकालीन (१५ वर्ष) सभासद देणगी १००० रु.
भारताबाहेरील सभासद देणगी १२५ $

# सद्धर्म

त्रै मा सि क

।। त्रैलोक्यं मंगलं कुरु ।। नामूलं लिख्यते किंचित् ।।

वर्ष : त्रेपन्नावे अंक : दुसरा ज्येष्ठ / आषाढ शके १९४० जुलै २०१८

## *संपादकीय*

### धर्म आणि अल्झायमर

जन्म आणि मृत्यु या दोन बिंदूमधला प्रवास म्हणजे 'जीवन.' पण या बिंदूंना जोडणारी रेषा ही सरळ नसते. अनेक व्यक्त अव्यक्त वळणे तिने घेतलेली असतात. म्हणून जीवन हे जगावे लागते. अनुभवासारखा दुसरा शिक्षक नाही हे म्हणूनच म्हटले जाते. आयुष्यामध्ये वय जसे वाढत जाते तसे सगळ्याच अवयवांची क्षमता शिथिल होत जाते. पण अनुभवाला जर का 'अवयव' म्हटलं तर तो मात्र जास्त 'प्रगल्भ' आणि 'मार्गदर्शक' होत असतो.

माणसाचा इतिहास हा काही लाखो वर्षांचा आहे. अन्न, वस्त्र आणि निवारा या त्याच्या गरजा सुरुवातीपासून आजही तेवढ्याच महत्वाच्या आहेत. मानवाच्या उत्क्रांतीवर डार्विननंतर बरेच लेखन झाले आहे. पण त्याच्या उत्क्रांतीची सर्वात मोठी प्रमाणं ही त्यांनीच निर्माण केलेल्या 'साहित्य', 'शिल्प', 'कला', 'नीती', 'अनीती'च्या कल्पना यातून शोधावी लागतात.

अलीकडे 'अल्झायमर' हा रोग आपणा सर्वांना परिचित झाला आहे. या रोगामध्ये मनुष्य असतो तसाच दिसतो, पण तो स्वतः मात्र सर्व काही विसरलेला असतो. काहीशी अशीच परिस्थिती आपल्या धर्म आणि इतिहासाची झालेली आहे.

नवं आणि जुनं या शब्दांना जोडलेले सांस्कृतिक भार अनेक वेळा 'क्षमतांचे' सांस्कृतिक पूर्वग्रह निर्माण करतात. जुने म्हणजे मागासलेले, अप्रगत, उपयुक्तता हरवलेले, तर नवीन म्हणजे आधुनिक, प्रगतीशील व उपयुक्त असा अगदी सहज समज होऊन जातो. एखादं यंत्र किंवा औषध इत्यादी तत्सम

(पृष्ठ क्र. २७ वर)

## सद्धर्म त्रैमासिकासंबंधी माहिती व सूचना

१) 'सद्धर्म' त्रैमासिकाचे वर्ष एप्रिल ते मार्च आहे. सौ. मालतीबाई नवाथे ट्रस्टच्या सद्धर्म प्रकाशनातर्फे हे त्रैमासिक एप्रिल, जुलै, ऑक्टोबर व जानेवारी या महिन्यात प्रसिद्ध केले जाते. या अंकाचे वर्षात केव्हाही सभासद होता येते. सभासद झाल्यावर त्या वर्षाचे ४ अंक पाठविले जातील.

२) ट्रस्टच्या कार्यालयाचा पत्ता : सौ. मालतीबाई नवाथे ट्रस्ट, द्वारा लक्ष्मी-केशव कार्यालय, प्रताप सिनेमासमोर, कोलबाड, ठाणे-४००६०१. इमारतीचे बांधकाम सुरु असल्याने कार्यालय बंद आहे. कृपया टपाल व मनीऑर्डर्स पाठवू नये.

३) सभासद देणगी : वार्षिक ७५ रु., दीर्घकालीन १००० रु.(१५ वर्षाकरता) परदेशस्थ सभासदांना १२५ $ (U.S.) दीर्घकालीन योजना (१५ वर्षाकरता).५०० रुपये आजीव सभासद योजना २००९ पासून बंद करण्यात आली असून नवीन दीर्घकालीन सभासद योजना सुरु करण्यात आली आहे. ३१ मार्च २००९ पर्यंत झालेल्या सर्व आजीव सभासदांना हा अंक त्यांच्या हयातीपर्यंत पाठविला जाईल. बऱ्याच आजीव सभासदानी वाढत चाललेल्या महागाईचा विचार करुन आम्ही केलेल्या विनंतीनुसार ऐच्छिक देणगी म्हणून ५०० रुपये ते १००० रुपये पाठविले आहेत. ज्यांनी आजपर्यंत ऐच्छिक देणगी पाठविली नाही त्यांनी ती लवकर पाठवावी अशी कळकळीची विनंती आहे.

४) देणगी, टपाल, मनीऑर्डर व धनादेश (चेक) किंवा धनरोखाने (डिमाण्ड ड्राफ्ट) कार्यकारी विश्वस्तांच्या पत्त्यावर* पाठवाव्यात. देणगी पाठविताना आपले संपूर्ण नाव (संस्था अस त्यास अध्यक्ष किंवा कार्यवाह) पूर्ण पत्ता (पिन कोडसह) सभासद क्रमांक (सभासद असल्यास) व दूरध्वनी क्रमांक (कोड नंबरसह) ही माहीती सुवाच्य अक्षरांत कळवावी.

**देणगी ट्रस्टच्या खालील बँकांतील सेव्हिंग्ज खात्यांतही भरता येईल.**

| बँक | शाखा | खाते क्र. | बँक IFSC कोड |
|---|---|---|---|
| **स्टेट बँक ऑफ इंडिया** SBI | **जे के ग्राम, ठाणे (प.)** | **10884930955** | **SBIN 0009056** |
| **ठाणे जनता सहकारी बँक** TJSB | **खोपट, ठाणे (प.)** | **009110100016689** | **TJSB 0000009** |
| **ठाणे भारत सहकारी बँक लि.** TBSB | **मुख्य शाखा,ठाणे (प.)** | **002115000024520** | **TBSB 0000002** |

वरील सर्व बँक खात्यांचे दिलेले तपशील वापरुन आपणास सद्धर्म त्रैमासिकाची देणगी पाठविण्याची सुविधा उपलब्ध झाली आहे. आता देणगी पाठविण्यासाठी भ्रमणध्वनी (Mobile Application) चा वापर करूनही ती पाठवू शकता. त्याचा निश्चित वापर करावा. त्याचा उपयोग करून आपण देणगी पाठवितांना या (Mobile Application) च्या Narration रकान्यात प्रथम देणगीदार क्रमांक, आपले पूर्ण नाव व भ्रमणध्वनी क्रमांक क्रमाने लिहिणे आवश्यक आहे. अन्यथा आपले नावावर देणगी जमा करणे कठीण पडते. हे लक्षात घ्यावे, व सहकार्य करावे. ही विनंती.

भारतीय स्टेट बँक त्यांच्या इतर शाखांतून आलेली रोख रक्कम (चेक नव्हे) ग्राहकांच्या खात्यांत जमा करण्याकरता २५ रुपये सेवा शुल्क आकारते. तेव्हा त्या बँकेत देणगी रोख रकमेत पाठविताना २५ रुपये अधिक पाठवावे.

वरील बँकांमार्फत देणगी पाठविल्यास पोस्टकार्डाने किंवा दूरध्वनी वरुन ट्रस्टच्या कार्यालयात किंवा श्री. प्रकाश भास्कर दीक्षित (कार्यकारी विश्वस्त) यांना कळवावे. यामुळे देणगीची नोंद घेणे सोयीचे होईल. (पत्ता पुढे दिला आहे.)

५) सद्धर्म त्रैमासिकासंबंधी अधिक माहिती हवी असल्यास खालील ठिकाणी संपर्क साधावा.

*श्री. प्रकाश भा. दीक्षित, ३०२, दुर्गा सोसायटी, कोलबाड, ठाणे ४०० ६०१. दू.क्र. : २५४७२००५, भ.क्र.: ९८१९६९३१९५/९०८२९९०४३१ अंकाच्या पाकिटाच्या पत्त्याच्या लेबलवर खालील माहिती छापली आहे.

सभासद क्रमांक वादे (वार्षिक देणगीदार सभासद), दीका (दीर्घकालीन सभासद), आ.(आजीव सभासद), कामे (कायम भेट)'वादे' व 'दीका' याच्या पुढे देणगी संपण्याचा महिना व वर्ष नोंदविलेले असते.

**- संपादक**

## *अनुक्रमणिका*


| | |
|---|---|
| संपादकीय | १ |
| देणगीसंबंधी निवेदन | २ |
| संस्कृत सुभाषितांचे अंश व समानार्थी म्हणी, वाक्प्रचार | ४ |
| गीतकृष्णायन-भाग ५- कुरूक्षेत्र | ५ |
| कर्म-मीमांसा | ७ |
| सुभाषित-कथा मित्र तयास म्हणावे | १३ |
| निगम-आगमात्मक हिंदु धर्म | १६ |
| मरणाचे स्मरण असावे... | १९ |
| ''भिऊ नकोस, मी तुझ्या पाठीशी आहे'' | २१ |


### सद्धर्माची प्रकाशने

(पोस्टेज सह)

१) सुलभ संध्या व पूजा रु. ५
२) श्री गणेश चतुर्थी पूजाविधि रु. ५
३) हरितालिका पूजा विधि रु. १०
४) श्री सत्यनारायण पूजा व कथा रु. १५
५) कोजागिरी पूजाविधि (मराठी कथेसह) रु. १०
६) तुलसी विवाहविधि रु. १०
७) पातंजल योग सूत्राणि (मराठी अर्थासह) रु.२५
८) कै. ह.ज. दामले स्मृती विशेषांक रु.१५ (या अंकात मौलिक विचारांचे लेख व उद्बोधक, उपयुक्त माहिती आहे. अवश्य संग्रही असावा, असा हा अंक आहे.)
९) सौंदर्यलहरी स्तोत्र (मराठी समश्लोकीसह) रु.३०
१०) उपासना रु. ४०
११) श्रीरामरक्षेतील व्याकरण रु. ५०
१२) चांगदेव पासष्टी रु. ४०
१३) गंगालहरी रु. २५
१४) गणपत्यथर्व शीर्षांतील व्याकरण रु. ३०
१५) सांख्यदर्शन रु. ३०
१६) श्री लक्ष्मी पूजा विधीः (हस्तलिखीत) रु. १५

**एप्रिल ते जून २०१८**

**विशेष देणगीदार - रु. १०१५/-**

श्री. गजानन नारायण कापडी, पर्वरी गोवा

**दीर्घकालीन सभासद (दी. का.)- रु. १०००/-**

श्रीमती. अनुपमा वि. केळकर, कल्याण (प)
श्री. निखिलेश भालचंद्र चौगुले, ठाणे (प)
श्री. शाम रामकृष्ण खांडेकर, सातारा

**- संपादक**

## संस्कृत सुभाषितांचे अंश व समानार्थी म्हणी, वाक्प्रचार

दि. दा. औटी

लेख ३५ वा

**स्वभावो दुरतिक्रमः।**[३९३]

स्वभावाला औषध नाही.

**यः स्वभावो यस्यास्ति स नित्यं दुरतिक्रमः।**
**श्वा यदि क्रियते राजातत् किं नाश्नात्युपानहम्**

उपानह – कातड्याचा जोडा.

ज्याचा जो स्वभाव असतो तो कधी बदलत नाही. कुत्र्याला राजा केले तरी तो जोडा खाल्ल्याशिवाय राहणार नाही.

**संतोषं जनयेत्प्राज्ञस्तदेवेश्वरपूजनम।**[३९४]

शहाण्याने सर्वांना आनंद देत रहावे. तेच खरे ईश्वरपूजन आहे.

पहिली ओळ :

**येन केन प्रकरिण यस्य कस्यापि देहितः**

कोणत्याही प्रकाराने कोणालाही नेहमी आनंद देत रहावे खरी ईश्वरपूजा तीच आहे.

**अलसस्य कुतो विद्या, अविद्यस्य कुतो धनम।**[३९५]
**अधनस्य कुतो मित्रम्, अमित्रस्य कुतो सुखम्।।**

आळशाला विद्या कोठली? अशिक्षिताला धन कोठले. अधनला मित्र कोठला आणि अमित्राला सुख कोठले?

**अकुली नोऽपि विद्वान्, दैवतैरपि पूज्यते।।**[३९६]

मनुष्य कुलीन घराण्यातला नसेल पण तो जर विद्वान असेल तर त्याला सर्वत्र मान मिळतो कारण म्हटलेच आहे की 'विद्वान् सर्वत्र पूज्यते।'

पहिली ओळ –

**विद्याविधिविहीनेन किं कुलीनेन–देहिनाम।**

**अतितृष्णा न कर्तव्या।**[३९७]

आसीची हाव करू नये.

**अतितृष्णा न कर्तव्या, तृष्णा नैव परित्यजेत्।**
**शनैः शनैश्च भोक्तव्यं स्वयं वित्त–मुपार्जितम्।।**

माणसाने अती तृष्णा करू नये पण तृष्णा ही सोडू नये. स्वतः मिळविलेल्या धनाचा हळूहळू उपभोग घ्यावा.

**अनिच्छयाऽपि संस्पृष्टो दहत्येव हि पावकः।**[३९८]

अग्नीला चुकून जरी स्पर्श झाला तरी तो चटका देतोच.

पहिली ओळ –

**हरिर्हरति पापानि दुष्ट–चितैरपि स्मृतः।**

दुष्ट मन असलेल्या माणसाने हरिचे (चुकून) स्मरण केले तरी तो त्याच्या पापाचे हरण करतो.

**कारणात्प्रियतामेति द्वेष्यो भवति कारणात्।।**[३९९]

कारणामुळेच प्रेम निर्माण होते किंवा कारणामुळेच माणसे एकमेकांचा द्वेष करू लागतात.

(पृष्ठ १२ वर)

## गीतकृष्णायन
## भाग ५ . कुरूक्षेत्र

प्रसाद औटी

**'गीता संदेश' – वृत्त आनंदकंद**

आनंदकंद ठेवा । वाटे मनास दयावा।
पार्था करी कुडावा । हा योग जाण माझा ॥१॥

जे जाणतोस सारे । ते सर्व मी असे रे।
नाना रुपे प्रकारे । हा योग जाण माझा ॥ २॥

मी एक पाहसी तू । रात्रंदिनी स्मरी तू ।
अन्यांस विस्मरी तू । हा योग जाण माझा ॥३॥

भूतांस प्रेम दयावे । त्यांचे भले पहावे ।
कर्तव्य ते करावे । हा योग जाण माझा ॥४॥

कर्मे जरी फळावी । प्रेमेच स्वीकरावी ।
आशा मनी नसावी । हा योग जाण माझा ॥५॥

होता उपासना ही । सोडील वासनाही ।
आनंदकंद राही । हा योग जाण माझा ॥६॥

कुरूक्षेत्री युद्ध वणव्यागत पेटलं होतं. कृष्ण स्वतः अर्जुनाचं सारथ्य करत होता, त्याची काळजी वहात होता, त्याला जय कसा मिळेल पहात होता. पितामह भीष्म कौरवांचं सेनापतीपद संभाळत होते. वेगळाल्या व्यूहरचना करून आणि डावपेच लढवून ते पांडवांच्या सैन्याचा नाश करत होते. पण अजूनही कोणत्याच पांडवाच्या केसालाही धक्का लागला नव्हता. पांडवनाशासाठी उतावीळ झालेल्या दुर्योधनानं अखेर भीष्मांना डिवचलंच, पितामह, कोणाच्या समाधानासाठी आपण ही लुटुपुटुची लढाई करताहात?

दुर्योधना, तुला म्हणायचंय तरी काय? न कळून भीष्मांनी विचारलं.

तुम्ही भले इतर लहानमोठे सहस्त्रावधी योद्धे मारताहात पण एकही पांडव मात्र अजून मारला गेला नाहीये! तो छद्मीपणे म्हणाला. दुर्योधनाचा हेतू साध्य झाला. भीष्मांनी तत्क्षणी प्रतिज्ञा केली, असं काय! मी आता असं युद्ध करतो की प्रत्यक्ष कृष्णालाही आपली प्रतिज्ञा मोडून शस्त्र हाती घ्यावं लागेल!

दुसऱ्या दिवशी अतुलनीय पराक्रम दाखवून भीष्मांनी पांडवांना सळो की पळो करून सोडलं. प्रत्यक्ष पशुपतीला हार न जाणारा अर्जुनही त्यांच्यासमोर निष्प्रभ ठरला. भीष्म परम कृष्णभक्त! कृष्णानं त्यांची प्रतिज्ञा खोटी ठरू नये म्हणून स्वतःची प्रतिज्ञा मोडली आणि सुदर्शन चक्र हाती घेऊन तो त्यांचा शिरच्छेद करायला रणांगणात उतरला!!

ते पाहून भीष्मांच्या डोळ्यांतून आसवं वाहू लागली. त्यांनी शस्त्रत्याग केला आणि कृष्णासमोर नतमस्तक होऊन म्हटलं, ये कृष्णा, आपल्या श्रीकरांनी माझ्या आयुष्याचा अंत कर! ज्याच्या उपासनेत आयुष्य गेलं त्याच्याच हातून मरण यावं हा दुग्धशर्करा योग येण्यासाठी मी किती पुण्य केलं असेन!

पण तेवढ्यात अर्जुनानं कृष्णाच्या पायांना मिठी घातली. तो अगतिक होऊन म्हणाला, कृष्णा, तुला मी शस्त्र वापरू देणार नाही. माझं युद्ध मलाच लढू दे! तू पाठीशी आहेस ते मला पुरेसं आहे. आता तूही बघच माझा पराक्रम!

फिरून घनघोर रणधुमाळी झाली. असे नऊ दिवस गेले पण युद्ध निर्णायक होईना. शेवटी कृष्णानं धर्मराजाला एक युक्ती सांगितली. त्यानुसार धर्म रात्री भीष्मांच्या शिबिरात पोहोचला. समईच्या मंद प्रकाशात ध्यानस्थ भीष्मांच्या चरणाला त्यानं स्पर्श केला. विजयी भव! असं आशीर्वचन देत त्यांनी डोळे उघडले आणि धर्माला पाहून ते चमकलेच! पण शेजारीच मंदस्मित करत उभा असलेल्या कृष्णाला पाहिल्यावर त्यांच्या सर्व प्रकार लक्षात आला. ते त्याला वंदन करुन म्हणाले, जशी तुझी इच्छा श्रीहरी! मी माझा आशीर्वाद खोटा ठरू देणार नाही. उदया शिखंडीला समोर करून अर्जुनानं माझ्यावर शरवर्षाव करावा. शिखंडी क्लीब असल्यानं मी त्याच्यावर शस्त्र उचलणार नाही!

दुसऱ्या दिवशी शिखंडीला पुढे करून अर्जुनानं दिवसभर भीष्मांवर असहय शरधारा सोडल्या. सूर्यास्ताच्या वेळी अखेर युद्ध थांबलं आणि भीष्म रथातून खाली कोसळले! त्यांना तसं पडलेलं पाहून कृष्णार्जुन रथातून खाली उतरून त्यांच्याजवळ गेले. कृष्णाचं रूप त्याही अवस्थेत डोळयात साठवण्याचा प्रयत्न करत आणि क्षीण हसून भीष्म कृष्णाला म्हणाले.

**'भीष्म निर्याण' – जाती सारिका**

अखेरचा हा प्रणाम घ्यावा भीष्माचा माधवा
घ्यावा भीष्माचा माधवा ॥ धृ ॥

दुर्योधन बोले डिवचोनी
त्यायोगे मम चित्त खवळुनी
शपथ घेतली क्षुब्ध होउनी
निरुपायाने शस्त्र उचलण्या लाविन मी केशवा ॥ १॥

पाहुन तू मम पराक्रमासी
तव भक्ताची लाज राखसी
चक्राने मज वधण्या उठसी
पार्थ विनवतो त्या समयी तुज मी वधतो कौरवां ॥ २॥

युद्ध सुरू मग घोर जाहले
ना कोणी कोणास हरवले
युधिष्ठिराला तू सांगितले
आशीर्वादा माग जाउनी भीष्मांसी पांडवा ॥३ ॥

सायंकाली शिबिरी बसलो
ध्यानामाजी मग्न जाहलो
स्पर्श चरणि होताच म्हणालो
विजयी होउन बाळांनो तुम्हि कीर्तीला वाढवा ॥४ ॥

ध्यान संपता नेत्र उघडले
समोर तेव्हा पांडव दिसले
शब्द कधी ना फुकाच गेले
सांगे त्यांना क्लीबा करुनी पुढे शरां वर्षवा ॥५॥

शिखंडीस मग पुढती केले
क्लीब बघुन मी शस्त्र त्यागले
पार्थे अगणित बाण वर्षले
असहय होउन कोसळलो मी भूमीवर तेधवा ॥६॥

कर्तव्याते काया झिजली
मनिषा आता एकच उरली
उत्तरायणा घटिका आली
त्या निकराच्या क्षणी मुकुंदा जवळी तू मज हवा ॥७ ॥

(पृष्ठ १५ वर)

अगदी अनादी कालापासून या जगात निर्माण झालेल्या निरनिराळ्या धर्मग्रंथांत, माणसाने कसे वागावे, कसे वागू नये. समाज स्वास्थ्याच्या दृष्टीने त्याची समाजाशी किंवा देशाशी काय बांधिलकी असते व त्या अनुषंगाने कोणते कृत्य समाजसेवी वा कोणते समाजद्रोही याचा निर्णय करण्यासाठी काही नीतिनियम घालून दिलेले आहेत. धर्मशास्त्रांप्रमाणेच अगदी ॲरिस्टॉटलपासून एमरसन, काँट इत्यादी पाश्चात्य तत्त्वज्ञान्यांनीही सत्कर्म-दुष्कर्मांचा (म्हणजेच धर्मशास्त्रांच्या भाषेत पुण्यकर्म आणि पापकर्मांचा) निर्णय कसा करावा याचे तात्विक व तार्कीक दृष्ट्या विश्लेषण केले आहे. अशाच तत्त्वांचा आधार घेऊन निरनिराळ्या देशांत कायदेही झाले असून न्यायसंस्थाही त्यानुसार निर्णय देत असतात व त्याप्रमाणे दुष्कृत्य करणारांना त्या त्या देशांत शिक्षाही ठरविल्या जातात.

नीतिशास्त्राातील या सर्वसामान्य नियमांनाही काही अपवाद असतात. परंतु ते अपवाद केव्हा व कसे करावयाचे त्याबाबत निश्चित असे मार्गदर्शन नीतिशास्त्राला देता येत नाही. (किंवा त्यात दिलेले नसते) कारण त्यांत काल-परिस्थितीप्रमाणे बदल होत असतो. काही परिस्थितीत सांगितलेल्या कराव्या लागणाऱ्या अपवादांनाही दुसऱ्या परिस्थितीत अपवाद करावे लागतात व या बाबतीतले निर्णय बहुतेकवेळी (Subjective) निर्णय करणाऱ्या व्यक्तीच्या वैयक्तिक विचारसरणीवर अवलंबून असतात.

भौतिक शास्त्रांतही नियमांना अपवाद असतात व काहीवेळा त्या अपवादानाही अपवाद असतात. उदा. फेब्रुवारी महिन्याचे दिवस २८ असतात हा नियम झाला. परंतु चार या संख्येने भाग जाणाऱ्या सनाच्या वर्षी फेब्रुवारीचे दिवस २९ होतात. हा त्या नियमाला अपवाद झाला. पण १०० नी भाग जाणाऱ्या सनाच्या वर्षी (चार नी भाग जात असूनसुद्धा) फेब्रुवारीचे दिवस २८ च धरावयाचे हा अपवादांना अपवाद झाला व त्याच्याही पुढे ४०० नी भाग जाणाऱ्या सनाच्या वर्षी फेब्रुवारीचे दिवस (पुन्हा) २९ धरावयाचे (सन २००० साली फेब्रुवारीचे दिवस २९ होते). हा अपवादाच्या अपवादाला अपवाद झाला. परंतु विज्ञानातील नियमांना असे अपवाद किंवा अपवादांची मालिकाअसली तरी ते अपवाद केव्हा व कसे लागू होतात याबद्दल अगदी निश्चित नियम असतात व त्यामुळे त्याबाबतीत निर्णय करण्यामध्ये कोणतीच (Ambiguity) संदिग्धता राहात नाही. परंतु नीतिशास्त्रांची गोष्ट भौतिक शास्त्रांच्या तुलनेत खूपच निराळी आहे. नीतिशास्त्रातील नियमच, सामाजिक रुढी, सभ्यता किंवा विचारसरणीप्रमाणे निरनिराळ्या प्रदेशात बदलत असतात, किंबहुना एकाच देशातील नियमही

काळाप्रमाणे बदलत असतात. उदा. सौदी–अरेबियात स्त्रीच्या चेहेऱ्यावरील बुरखा ढळला तरी ते गैर मानले जाते. बुरख्याशिवाय स्त्रीने सार्वजनिक ठिकाणी जाणे हा गुन्हाच मानला जातो; तर पाश्चात्य देशांत स्त्रिया केवळ बिकिनीमध्ये समुद्रावर बिनदिक्कत सूर्यस्नान करतात त्यात कोणालाच काही गैर वाटत नाही.

सत्य बोलावे, दुसऱ्याची हिंसा करू नये. यासारखी नीतिशास्त्रातील मूलभूत तत्त्वे (नियम) सर्वच धर्मांत मान्यता पावलेली आहेत. प्रत्येक कर्माला त्याचे स्वतंत्र (Intrinsic) स्वाभाविक गुण असतात. जसे कोणा प्राण्याची हत्या हे पापात्मक कर्म होते. त्यांतही मानवाची हत्या हे त्याहीपेक्षा मोठे पाप समजले जाते. दुसऱ्याला दान करणे त्याला संकटकाळी मदत करणे हे (स्वभावतः) पुण्य कर्म मानले जाते. म्हणून पाप पुण्याची सर्वांत सोपी व्याख्या 'परोपकारः पुण्याय, पापाय परपीडनम्।' अशी एका संस्कृत सुभाषितात केली आहे व ती सर्व धर्मांना तत्त्वज्ञान्यांना मान्य व्हावी अशीच आहे. परंतु कर्माचा केवळ स्वाभाविक गुण लक्षात घेऊन ते पापकर्म का पुण्यकर्म याचा निर्णय नेहमीच होऊ शकत नाही; तर त्यासाठी ते कर्म करणाऱ्या कर्त्याच्या बुद्धीचाही (म्हणजे त्याने कोणत्या हेतूने ते कर्म केले आहे याचाही) विचार करावा लागतो. जसे दरोडेखोराने घर लुटण्यात विरोध करणाऱ्या धनी–मालकाचा केलेला खून फाशीच्या शिक्षेला पात्र होतो, तर धनी–माणसाने स्वसंरक्षणार्थ लूट करणाऱ्या दरोडेखोराचा केलेला खून तितकासा गंभीर ठरत नाही किंवा काही परिस्थितीत तो गुन्हाही ठरत नाही. तोच मनुष्यवध एका पोलिसाने (encounter मध्ये) आतंकवाद्याचा केला असेल तर ते कृत्य गुन्हा ठरत नाहीच पण प्रशंसनीय वीरकर्म ठरते.

भगवद्गीतेत १८ व्या अध्यायात (श्लोक २३, २४ आणि २५) कर्माचे गुणानुरुप सत्त्व, रज, तम असे तीन प्रकार सांगितले आहेत. तसेच ते कर्म करणाऱ्या कर्त्याचेही (ते कर्म करण्याच्या मागे) त्याच्या हेतूप्रमाणे सत्त्व, रज, तम असे (श्लोक २६, २७, २८) तीन प्रकार सांगितले आहेत.

कोणत्याही कर्माचा 'पाप–पुण्य' निर्णय करण्यासाठी त्या कर्माच्या स्वाभाविक गुणापेक्षा ते कर्म करण्यास प्रेरणा देणाऱ्या कर्त्याच्या मनातील बुद्धि हेतूच जास्त महत्त्वाचे ठरतात असे गीता सांगते.

दूरेण ह्यवर कर्म बुद्धियोगात् धनञ्जय। गी. अ.२।४९ मनुष्यवधाचे तेच कर्म वध करणाऱ्या कर्त्याच्या हेतूप्रमाणे (व परिस्थितीप्रमाणे), कधी पाप तर कधी क्षम्य पाप तर कधी पुण्यही कसे ठरु शकते ते आपण मागील परिच्छेदात पाहिलेच आहे.

याही पुढे जाऊन काही वेळेस गुन्ह्याचे मूल्यमापन करताना गुन्हेगाराच्या हेतूबरोबर त्या हेतूस कारण होणाऱ्या परिस्थितीचाही विचार करावा लागतो. एखादा अगदी साधु–वृत्तीचा सज्जन गृहस्थही आपल्या भावाचा खून झालेला पाहून भावनेच्या भरात

(सूडबुद्धीने) त्या खुन्याचा वध करण्यास प्रवृत्त होऊ शकतो. अशावेळी भावाने केलेल्या खुनाच्या घटनेकडे परिस्थिती लक्षात घेऊन सहानुभूतीने पाहणेच न्याय्य ठरते.

याप्रमाणे कोणत्याही कर्माचा पाप-पुण्य निर्णय करण्यास व त्या पाप-पुण्याची प्रत (Degree) ठरविण्यासाठी, 'कर्म' (कर्माचे स्वाभाविक गुण) कर्त्याची 'बुद्धि', व त्या बुद्धीस कारण असणारी 'परिस्थिती' या तिन्ही गोष्टींचा विचार करावा लागतो. परंतु या तिन्ही गोष्टींना सापेक्ष महत्त्व (Relative weightage) किती व कसे द्यावयाचे याबद्दल ठोस नियम सांगता येत नाहीत. ते निर्णय देणाऱ्याच्या न्याय बुद्धिवरच सोपवावे लागते म्हणूनच 'गहना कर्मणो गतिः।' असे गीतेत म्हटले आहे. (अ.४/१७)

मूळ तीन रंगांच्या (निळा, पिवळा व लाल) निरनिराळ्या प्रमाणांतील मिश्रणाने ज्याप्रमाणे अगणित रंगांच्या छटा तयार होतात, एक दुसऱ्यासारखी नसते. त्याप्रमाणेच या तीन गोष्टींचा (योग्य ते सापेक्ष महत्त्व ठरवून) विचार करून निर्णित केलेल्या कर्माच्या गुणांकनाप्रमाणे, कर्माच्या अगणित प्रतींच्या तऱ्हा पहावयास मिळतात.

कोणतेही कर्म, सत्कर्म (पुण्यकारक) का दुष्कर्म (पापकारक) हे ठरविण्यासाठी व त्या पाप-पुण्याची प्रत (Degree) ठरविण्यासाठी निरनिराळ्या धर्मग्रंथांत व तत्त्वज्ञान पर ग्रंथांत थोड्याफार फरकाने वरील प्रमाणेच मार्गदर्शक तत्त्वे सांगितलेली आढळतात.

समाजवादी विचारसरणीने प्रभावित झालेल्या काही अर्वाचीन पाश्चात्य पंडितांनी 'पुष्कळांचे पुष्कळ सुख साधणारे ते सतकर्म अशी सत्कर्माची (धार्मिक भाषेत पुण्याची) सोपी व्याख्या केली आहे व याच तत्वाच्या प्रभावाने अलिकडील काळात जगातील निरनिराळ्या देशांतील राजसत्ता विलय पावून तेथे लोकसत्ताक शासने स्थापन झाली. परंतु सर्व परिस्थितीत या तत्वाचा आधार घेऊन निर्वाह चालत नाही.

आम्हाला अभ्यासाच्या तासांत गोडी वाटत नसून मुलामुलींनी एकत्र येऊन हॉटेलात बसून गप्पा टप्पा करण्यात खाण्यापिण्यात धुम्रपान करण्यात व मोबाईलवर गेम्स खेळण्यात जास्त सुख वाटत असल्यामुळे कॉलेज चालकांनी अभ्यासाचे तास कमी करून आम्हाला सुख देणाऱ्या गोष्टी करण्यासाठी (कॉलेजने) जागेची व वेळेची व्यवस्था करावी असे निवेदन कॉलेज विद्यार्थी संघटनेने ९०% विद्यार्थ्यांच्या सह्या घेऊन, कॉलेज व्यवस्थापनाकडे पाठविले, तर 'पुष्कळांचे पुष्कळ सुख' या तत्त्वानुसार कॉलेज व्यवस्थापनाने विद्यार्थ्यांची अशी मागणी मान्य करणे योग्य होईल का? केवळ बहुसंख्य लोकांना त्यांच्या हिताची वाटते म्हणून चुकीची गोष्ट शासनाने ग्राह्य ठरविणे चुकीचेच ठरेल. बहुसंख्य लोकांना त्यांच्या स्वैर वागण्यावर नियंत्रण आणणारा कायदा नकोच असतो. बहुसंख्यलोक स्वतःचाच विचार करताना समाजाच्या हिताचा विचार करीत नसतात. म्हणून शासनाला बहुसंख्य

लोकांना (सकृत दर्शनी) न रुचणारे कायदेही करावे लागतात. लोकमान्य टिळकांनी त्यांच्या गीतारहस्य ग्रंथात आणखी निरनिराळी उदाहरणे देऊन हेच दाखवून दिले आहे.

आपण आतापर्यंत पाहिलेल्या कर्म-विश्लेषण पद्धतीच्या पलीकडे जाऊन भगवद्गीतेने मात्र कर्माचा एक अनोखा पैलू किंवा गुणविशेष दाखवून त्यानुसार कर्म-मुल्यांकन शास्त्राला परिपूर्णता आणून दिली आहे. गीतेच्या तत्त्वाप्रमाणे, मनुष्य स्वसुखासाठीच कर्म करतो त्यावेळी त्याला सुख मिळो वा न मिळो ते कर्म (मनुष्याला) कर्त्याला काही उपाध्यांनी बांधून ठेवले. त्याला कर्मबंध अशी संज्ञा दिली जाते. उदा. मनुष्य वैवाहिक सुख मिळवण्यासाठी लग्न करतो. तेव्हा पाठोपाठ संसार करण्याची जबाबदारी त्याच्यावर येऊन पडते व संसारांतील अडचणींना तोंड देण्यासाठी तो बांधला जातो. एखादे सुख मिळाले की थोडावेळ समाधान वाटते पण काही काळानंतर आणखी सुखाची हाव वाढते व त्यामुळे मन अस्वस्थ होते किंवा मिळालेले सुख सतत कसे मिळेल याची विवंचना माणसाला त्रास देऊ लागते. म्हणजे 'कर्मबंध' हेच कर्माचे 'कर्मत्व' किंवा विशेष गुण आहे आणि याचसाठी म्हणजे कर्मबंधातून मुक्त राहण्यासाठी कर्मसंन्यास निष्ठेचा संन्यासी पंथ निर्माण झाला. परंतु भगवद्गीता सांगते की कर्मबंध टाळण्यासाठी कर्मसंन्यास अनिवार्य नसून कर्मयोगाच्या युक्तीने कर्म केल्यास मनुष्य कर्मबंधापासून मुक्त राहू शकतो. कर्मयोग युक्तीने कर्माचा 'कर्मबंधाचा' गुण विरुन गेला म्हणजेच त्याचे 'कर्मत्व' नाहीसे झाले की ते कर्म नसल्यासारखेच होते म्हणजे 'अकर्म' होते. अकर्म ही नवीन कल्पना व संज्ञा गीतेत ४ थ्या अध्यायाच्या १७ व्या श्लोकात प्रथम सांगितली गेली आहे.

मूळ श्लोक

**कर्मणो ह्यपि बोद्धव्यं बोद्धव्यं च विकर्मणः।**
**अकर्मणश्च बोद्धव्यं गहना कर्मणो गतिः॥१७॥**

मराठीत

**जाणिले पाहिजे कर्म, विकर्म कोण काय ते।**
**अकर्मही असे काय, कर्माचे तत्त्व गूढ ते ॥१७॥**

आणि या श्लोकानंतर, गीतेचा फार महत्त्वाचा, गीता तत्त्वज्ञानाची (कर्मयोगाची) मध्यवर्ती (Central Idea) कल्पना, अनोख्या शब्दात गूढरीतीने सांगणारा पुढचा श्लोक असा आहे.

मूळ श्लोक

**कर्मण्यकर्म यः पश्येदकर्मणि च कर्म यः।**
**स बुद्धिमान् मनुष्येषु स युक्तः कृस्न कर्मकृत् ॥१८॥**

(गीतेतील या श्लोकाच्या आधारे सत्य, अहिंसादी पंचशीलातील एकेक तत्त्वावर विश्लेषणात्मक लेख क्रमानें पुढील अंकांत वाचकांना वाचावयास मिळतील.- संपादक)

मराठीत

**पाही अकर्म कर्मात जो अकर्मात कर्मही।**

**तो बुद्धिमान लोकी या योगाने कर्म जो करी ॥१८॥**

या श्लोकाचा शब्दशः अर्थ असा आहे –

जो कर्मात अकर्म व अकर्मात कर्म पाहतो (म्हणजे ओळखू शकतो) असा कर्मयोगाच्या युक्तीने सर्व कर्मे करणारा मनुष्यच खरा (सर्व लोकात) बुद्धिमान समजावा.

कर्मयोगाच्या युक्तीने म्हणजे केवळ निष्कामवृत्तीने केलेले (चालून आलेले) लोकसंग्रहाचे कार्य ज्याला अकर्मच (कर्माचा दोष (कर्मबंध) विरुन गेलेले) दिसते तोच खरा बुद्धिमान म्हणजे अशा कर्माचा कर्मबंधाचा दोष विरलेला आहे असेच बुद्धिमंताने समजावे असा या श्लोकाचा अर्थ आहे. याच न्यायाने देशासाठी लढताना सैनिकाने शत्रूच्या केलेल्या वधाला (सामान्यपणे मानलेले) मनुष्यवधाचे पाप लागत नाही. म्हणून बुद्धिमंत अशा कर्मात अकर्मच पाहतात असे गीतेला सांगावयाचे आहे. या पुढे गीता सांगते की बुद्धिमान, कर्मात अकर्म पाहतो त्याचप्रमाणे काही अकर्मात (काही परिस्थितीत) कर्मही पाहतो.

अकर्माचे दोन अर्थ होतात. एक कर्माचा अभाव म्हणजे कर्मच नसणे ते अकर्म व दुसरा वर सांगितल्याप्रमाणे, ज्या कर्माचे कर्मत्व (कर्म बंधाचा गुण) नष्ट झाले आहे असे कर्म.

कोणत्याही गोष्टीचा अभाव म्हणजे ती अस्तित्वात नसताना आपल्याला त्या वस्तूचा गुण-प्रभाव कधीच जाणवत नाही. उदा. जिथे अंबाच नाही तिथे अंब्याचा गोड सुगंध आपल्याला कधीच जाणवणे शक्य नाही. परंतु गीता सांगते की 'कर्म' या नियमाला अपवाद आहे. कर्माचा अभाव असताना सुद्धा त्या कर्माच्या गुणांचा प्रभाव कधी कधी आपल्या प्रत्ययास येतो. जसे-एक आई आपला मुलगा नीट वागत नाही. अभ्यास करीत नाही. उनाडक्या करतो म्हणून त्याला रागाने बोलते व शिक्षा करण्याचे कर्म करते व त्यामुळे तो मुलगा चांगले वागू लागतो. तर दुसरी आई आपल्या उनाड मुलाला काहीएक न बोलता त्याच्याशी अबोला धरते (म्हणजे अकर्म पाळते) आईचे मौन त्या मुलास इतके जाचते की तो मुलगा (मूळचा चांगल्या प्रवृत्तीचा असल्यामुळे) वरमतो व आईने आपल्याशी प्रेमाने बोलावे म्हणून चांगले वागावयास लागतो. येथे दुसऱ्या आईच्या अकर्माचे फळसुद्धा पहिल्या आईच्या (शिक्षेच्या) कर्मासारखेच मिळाले आणि म्हणून एखाद्याा विशिष्ट परिस्थितीत अकर्मातसुद्धा जो कर्म पाहतो तोच खरा बुद्धिमंत असे गीतेला सांगावयाचे आहे.

कर्ममीमांसा शास्त्रात, गीतेच्या चवथ्या अध्ययातील हा १८ वा श्लोक याप्रमाणे अत्यंत महत्त्वाचा व अनोखा आहे. या श्लोकात कर्म-अकर्मांबद्दल सांगितलेले गूढ सत्य किंवा 'न्याय' पुढे सत्य-असत्य, हिंसा-अहिंसा, स्तेय-अस्तेय, परिग्रह-अपरिग्रह, ब्रह्मचर्य-गृहस्थाश्रम या जोड्यांना लावून आपण त्या त्या क्षेत्रातील कर्मांचे विश्लेषण

करून त्यांतील विरोधाभासांचे समाधान करू शकतो. नीतिशास्त्रांतील वरील पंचशील नियमांनाही काही विशिष्ट परिस्थितीत अपवाद करावे लागतात. त्याचे सूत्रही आपल्याला गीतेच्या वरील श्लोकात सापडते.

ज्याच्यावर खुनाचा आरोप सिद्ध झाला आहे अशा गुन्हेगाराला फाशीची शिक्षा सुनावताना न्यायाधीशाने 'अहिंसा परमो धर्मः' या तत्त्वाला अपवाद करणेच योग्य ठरले किंवा युद्धात सत्यं वदा या तत्त्वाला अपवाद करून आपल्या रजनीतिविषयी खोटी माहिती शत्रूकडे पोचवणे हेच सेनापतीचे पवित्र कर्तव्य ठरते.

कर्म-अकर्म, हिंसा-अहिंसा, सत्य-असत्य या जोड्या म्हणजे एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत आणि काही विशिष्ट (अपवादात्मक) परिस्थितीत-सत्यात असत्य व असत्यात सत्य-हिंसेत अहिंसा व अहिंसेत हिंसा दडलेल्या जो मनुष्य ओळखू शकतो व त्याप्रमाणे सामान्य नीतितत्त्वांना अपवाद कोठे व कसे करावयाचे हे जो जाणतो, तोच खरा बुद्धिवान किंवा पंडित जाणावा हेच महतत्त्व या गीतेच्या श्लोकात सांगितले आहे आणि म्हणूनच गीताज्ञानाला सर्वसंग्राहकता व सर्वसमावेशकता प्राप्त झाली आहे.

**कोणताही असो प्रश्न कोणाच्या जीवनीं जसा।**
**मिळे उत्तर गीतेत प्रसंगोपात्र युक्त त्या।।४।।**

आणि म्हणूनच 'एमरसन', शोपेनहॉवर, कांट इत्यादी पाश्चात्य पंडितांनीही त्यांच्या ग्रंथांत गीतेची तोंडभरून स्तुती केली आहे.

('गीताज्ञान-नवनीत' परिशिष्ट ३ श्रीमद् भगवद्गीतार्थ मधील चवथा श्लोक.)

**प्र. सि. मराठे**
४०२ सनफ्लॉवर, ठक्कर पार्क,
वाकोला, सांताक्रूझ (पूर्व),
मुंबई - ४०००५५
दूरध्वनी - २६६७२२०५
भ्रमणध्वनी - ९६१९८९६४३५

•••

(पृष्ठ क्र.४ वरून... **संस्कृत सुभाषितांचे अंश व समानार्थी म्हणी, वाक्प्रचार**)
पहिली ओळ -

**अर्थार्थी जीवलोकोऽयं न कश्चित् कस्यचित् प्रियः।**

ह्या जगात माणसांच्या कृती स्वार्थपर्यवसायी आहेत. कोणी कोणाचा नाही. (ऊर्दू म्हण 'दुनिया खुदगर्ज है)

**अर्धकुक्कुटीन्याय।**[४००]

अर्धी अर्धी कोंबडी.

कोंबडीचा पुढचा अर्धा भाग शिजविण्यासाठी आणि मागचा अर्धा भाग अंडी घालण्यासाठी वापरु म्हणणे म्हणजे एखाद्या गोष्टीपासून वाजवीपेक्षा अधिक फायदा घेण्याचा हास्यास्पद प्रयत्न. क्रमशः।

**दि. दा. औटी**
शिवकृपा, घर नं. ७३,
मु. पो. मुद्रे खुर्द, ता. कर्जत,
जि. रायगड - ४१० २०१
दूरध्वनी : ०२१४८-२२११०९
मोबाइल : ९४२००५९५७४

## सुभाषित-कथा
## मित्र तयास म्हणावे

श्रीकांत अनंत बर्वे

**क्षीरेणात्मगतोदकाय हि गुणा दत्ताः पुरा तेऽखिलाः**
**क्षीरे तापमवेक्ष्य तेन पयसा आत्मा कृशानौ हुतः ।**
**गन्तुं पावकमुन्मनस्तदभवत् दृष्टा तु मित्रा पदम्**
**युक्तं तेन जलेन शाम्याति सतां मैत्री पुनस्त्वी दृशी ।।**

पूर्वी...दुधाने आपल्याशी एकरुप झालेल्या पाण्याला आपले सर्व गुण दिले. असे हे दूध तापत ठेवल्यावर दुधाला होत असलेला ताप (अग्नीचे बसणारे चटके) पाण्याला सहन होईना. तो ताप स्वतःवर घेत पाण्याने आत्मसर्पण केले. (दुधातील पाण्याची वाफ झाली.) आपणावरील स्नेहामुळे मित्रावर कोसळलेले संकट (त्यामुळे होणारा मित्रविरह) दुधाला सहन होईना व दुधानेही आत्मसमर्पणाचा निर्णय घेऊन अग्नीत उडी घेण्याचा प्रयत्न केला. (दूध उतू जाऊ लागते) पण पुन्हा जेव्हा त्या दुधाला मित्र भेटतो गृहिणी उतू जाणाऱ्या दुधात पाणी शिंपडते/ घालते तेव्हा ते दूध शांत होते व परत खाली जाते. (आगीत उडी घेऊन आत्मसमर्पण करण्याचा निर्णय रद्द करते.) सज्जनांची मैत्री ही अशी असते.

अशी मैत्री असणाऱ्या दोन मित्रांची एक कथाच आपणासमोर ठेवतो.

बंगाल प्रांतात प्रसिद्ध असलेली ही कथा आहे चैतन्यमहाप्रभु यांच्या मित्रप्रेमाची!

बंगालमध्ये नवद्वीप नावाचे गाव आहे. (हेच गाव नदिया या नावानेही ओळखले जाते.) या गावात पंडित जगन्नाथ मिश्रा व त्यांची पत्नी शचीदेवी रहात होते. या दांपत्याला ओळीने ८ कन्या झाल्या. दुर्दैव असे की त्यातील एकही जगली नाही. बालपणीच गतप्राण झाल्या. त्या दुःखातून सावरत असताना पाठोपाठ दोन पुत्ररत्ने प्राप्त झाली. मोठयाचे नांव विश्वरुप व धाकटयाचे नाव विश्वंभर ! विश्वरुप पाठशाळेत शिकून विद्वान झाला पण वृत्तीने विरक्त असल्याने शिक्षण शिक्षण होताच घरातून निघून गेला. आई-वडिलांना फार दुःख झाले. हा शिक्षणाचाच परिणाम-असे त्यांच्या मनाने घेतले व म्हणून विश्वंभर तरी आपल्याजवळ रहावा म्हणून त्याला शिकवूच नये असे त्यांनी ठरविले. (या विश्वंभराचा जन्म निंबाचे वृक्षाखाली झाला म्हणून कौतुकाने ते त्यास निमाई म्हणत) विश्वंभराला त्यांनी पाठशाळेत घातलेच नाही.

गावातील लोक त्यांची समजूत काढीत असत 'अहो जगन्नाथजी, आमची मुले नाही का शिकली? ती कोठे घर सोडून गेली? शेवटी जगन्नाथ पंडितांची समजूत पटली. त्यांनी लाडक्या निमाईला गंगादास गुरुजींच्या पाठशाळेत घातले. निमाई पाठशाळेत जाऊ लागला तो कुशाग्र बुद्धीचा होता. एकपाठी होता त्यामुळे त्याने पाठशाळेतील अभ्यास लवकरच पूर्ण केला. गुरु गंगादासांचेही या शिष्यावर विशेष प्रेम ! घरात राहिलेल्या

एकुलत्या एक पुत्रावर मातापित्यांचेही अपार प्रेम ! ते त्याचे सर्व हट्ट पुरवीत असत. पण देवाला या सुखात असलेल्या कुटुंबाचे सुख पाहवेना ! मोठया पुत्राच्या आठवणीने अल्पशा आजाराने जगन्नाथ पंडिताचे देहावसान झाले. पत्नी शचीदेवी व निमाई यांचेवर दुःखाचा डोंगरच कोसळला ! या दुःखाने जबाबदारीची जाणीव होऊन निभाई सुद्धा शान्त बनला. हट्टीपणा कमी झाला. शचीदेवींनीही निमाई विद्वान व्हावा, कीर्तिमान व्हावा अशी आशा मनी धरुन त्याचे शिक्षण सुरुच ठेवले पण आता तू आधी गृहस्थाश्रम स्वीकारावास अशी इच्छा तिने निमाईपुढे प्रदर्शित केली. पण निमाईने मात्र त्यास ठामपणे नकार दिला. मला एवढयात लग्न करावयाचे नाही अजून शिकायचे आहे. नवद्वीप गावातच सार्वभौम नावाचे न्यायशास्त्र या विषयाचे विद्वान आचार्य होते. निमाई त्यांचेकडे गेला व त्याने न्यायशास्त्राचा अभ्यास सुरु केला. तेथे अनेक विद्यार्थी न्यायशास्त्राचे अध्ययन करीत होते. त्यापैकी रघुनाथ नावाच्या विद्यार्थ्यांशी निमाईची दाट मैत्री झाली. जसे राम-लक्ष्मण बंधुप्रेमासाठी, श्रावणबाळ-पुंडलीक हे माता-पित्यांच्या सेवेसाठी आदर्श मानले गेले अरहेत तद्वत मित्रप्रेम कसे असावे याचे उदाहरण म्हणून लोक यांच्याकडे बोट दाखवू लागले.

न्यायशास्त्राचा अभ्यास करता करता या दोघांनाही न्यायशास्त्रावर ग्रंथ लिहिले. आपला ग्रंथ या विषयावरील श्रेष्ठ ग्रंथ ठरावा अशी इच्छा रघुनाथाच्या मनी होती. पुढे एकदा नावेतून प्रवास करीत असताना रघुनाथाने निमाईला विचारले - 'मित्रा, न्यायशास्त्रावर ग्रंथ लिहिणार होतास ना? झाला का ? निमाईने ही उत्तर दिले. हो, झाला तर ! त्यावर रघुनाथने विचारले मग मला कधी दाखवशील? निमाई म्हणाला उद्याच दाखवितो. कबूल केल्याप्रमाणे दुसऱ्या दिवशी नावेतून प्रवास सुरु करताच मित्राला आपला ग्रंथ दिला. रघुनाथ ग्रंथ वाचु लागला. त्यांच्या डोळयातून अश्रुधारा वाहू लागल्या. ते लक्षात येताच निमाईने विचारले, रघुनाथा, काय झाले? काही दुःख आहे का? माझा ग्रंथ तुला आवडला नाही का? त्यात काही त्रुटी आहेत का? असल्यास निःसंकोचपणे सांग मी त्यात दुरुस्ती करेन. रघुनाथ उत्तरला- मित्रा, काय आणि कसे सांगू? न्यायशास्त्रावर मीहि एक ग्रंथ लिहिला आहे व माझाच ग्रंथ जगात, विद्वानात मान्य व्हावा अशी मनिषाही आहे. पण मित्रा, तुझा ग्रंथ वाचल्यावर मला कळले आहे की माझा ग्रंथ तुझ्या ग्रंथासमोर काहीच नाही. जसा सूर्यासमोर काजवाच! व या विचारानेच मला दुःख झाले आहे व डोळ्यातून अश्रुधारा येत आहेत.

निमाई अतिशय सहजपणे रघुनाथास म्हणाला - मित्रा, इतकेच ना? मग अजिबात दुःख करु नकोस ! मित्रा जगात तुझाच ग्रंथ सर्वश्रेष्ठ ठरावा इतकेच ना? मग काळजी कशाला ? दुःख कशाला ? त्यासाठी हा पहा मी माझा ग्रंथ पाण्यात सोडून देतो.

मित्रा, अरे नको...नको ! असे करु नकोस असे म्हणत असतानाच निमाईने

आपला ग्रंथ नदीच्या पाण्यात सोडून दिला सुद्धा ! व नंतर रघुनाथाला म्हणाला – मित्रा, आता तर नाही ना कसली चिंता ? मग डोळे पूस पाहू !

वाचकहो, निमाई वर्णाने गोरा होता म्हणून लोक त्याला गौरांग असेही म्हणत. याच गौरांगने पुढे गोपालकृष्णाची उपासना केली व तद्रुप झाला. म्हणून लोक त्याला गौरांगप्रभू म्हणू लागले. या गौरांगप्रभूंचे मित्र रघुनाथ पंडित या नावाने ख्यातकीर्त झाले.

याच विषयाला धरुन असलेला (मित्रलक्षणे सांगणारा) संत नरहरी सोनार यांचा अभंग उद्‌धृत करुन लेख संपवितो –

**मित्र तयास म्हणावे ।।धृ।।**
**स्वहिता सोडून मित्रासाठी त्वरितची जोधावे ।।१।।**
**संकटी आपण असतो जेव्हा उडी घेउनी धावे ।।२।।**
**विचार त्याला पुसता काही मार्गा उचितची दावे ।।३।।**
**म्हणे नरहरि मित्र मिळावा कृष्णार्जुन समभावे ।।४।।**

**– श्रीकांत अनंत बर्वे**
१/ए/१३१, कल्पतरु हिल्स,
टिकुजीनी वाडीसमोर, मानपाडा,
ठाणे – ४०० ६१०.
भ्रमणध्वनी : ९६१९०६००१५

•••



(पृष्ठ क्र.६ वरून... **गीतकृष्णायन**)

उच्चयोग ते जुळून येता
प्राण जाउ दे तुजला स्मरता
एक मागणे तुज भगवंता
मोक्ष नको मज तुझ्या भक्तिला देह मला दे नवा ॥८॥

भीष्मांनंतर कौरवांचं सेनापतीपद द्रोणाचार्यांनी स्वीकारलं. द्रोणांनी पांडवांविरूद्ध कौरव सैन्याची योजना चक्रव्यूह पद्धतीची केली. द्रोणांना माहित होतं की हा व्यूहभेद कसा करायचा याचं ज्ञान आणि कौशल्य फक्त अर्जुनालाच अवगत आहे. म्हणून बुद्धयाच अर्जुनाला दुसऱ्या स्थळी युद्ध करण्यात त्यांनी गुंतवून ठेवलं.

चक्रव्यूह कोणी भेदावा हा आता पांडवांपुढे प्रश्न निर्माण झाला. अशा आणीबाणीच्या प्रसंगी अर्जुन आणि सुभद्रेचा सुकुमार सुपुत्र अभिमन्यू पुढे सरसावला. सुभद्रेच्या उदरात अभिमन्यू असताना अर्जुनानं सुभद्रेला एकदा चक्रव्यूह भेदण्यासंबंधी माहिती सांगितली होती. त्या ज्ञानाच्या बळावर आपण हा व्यूह भेदून पांडवसैन्यावरचं संकट निवारण करू असा आत्मविश्वास कोवळया पण तेजस्वी अभिमन्यूनं दाखवला. धर्मराज आणि धृष्टद्युम्न यांना तो वारंवार विनवू लागला...

**प्रसाद दि. औटी**
न्यू अजंठा अव्हेन्यू, बि. नं.३ बी.-१,
६ वा मजला, ब्लॉक नं. १८,
पौड रोड, कोथरूड, पुणे - ४३३ ०३८
दूरध्वनी : ०२०-२५४५००८९
मोबाइल : ९८८११०४०७४

या शीर्षकावरून निगम आणि आगम असे हिंदुधर्म संस्कृतीचे दोन प्रवाह आहेत असे ध्यानात येते आणि ते खरे आंहे. फार खोल विद्वत् चर्चेत न शिरता पण ठामपणे असे म्हणता येईल की निगमात्मक धर्मसंस्कृती ही यज्ञसंस्थेला केंद्रस्थानी ठेवून विकसित झालेली हिंदु संस्कृती. तसे पाहता हिंदु हा शब्द आपल्या पूर्वजांना माहितच नव्हता. तो सिंधुचा अपभ्रंश आहे. इतिहासकारांना सिंधुसंस्कृती माहित आहे. सिंधुनदीच्या पलिकडे राहाणारे लोक म्हणजे पाश्चात्यांच्या पश्चिम आशियातील देशांच्या दृष्टीने ते हिंदु. त्यांचे स्थान हिंदुस्थान. त्याचाही अपभ्रंश म्हणजे Inde हिंदोस्ताँ इ. आपल्याकडील पुरोगामी हिंद इंडिया या शब्दांचा वापर करतात. पण पाकिस्तानी लोक आपल्या देशाला हिंदोस्ताँ असेच म्हणतात. व्हिट्रव्हियस या लेखकाने Ten books on Architecture हा ग्रंथ इ. स. पूर्व पहिल्या शतकात लिहिला. त्यात भारतासंबंधी हाताच्या बोटावर मोजण्याइतकेच शब्द आहेत. Inde, Ganga Himalay इ. मात्र त्यात Temple Architecture हे एक प्रकरण आहे. मात्र ते रोमन मंदिर आहे.

तर भारतात देखील इ. स. पूर्व मंदिराचे त्रोटक उल्लेक आहेत. निगम म्हणजे वेद हे स्थूल मानाने रुढ आहे आणि आपल्या दृढ विश्वासानुसार वेद अनादि आणि अपौरुषेय आहेत. लोकमान्य टिळकांपासून मॅक्समूलरपर्यंत संशोधकानी इ. स. पूर्व ६००० ते इ. स. पू. १५०० पर्यंत वेदरचनेची कालनिश्चिती केली आहे. पण भौगोलिक ठोकताळ्यावरून सरस्वतीच्या तीरांवर ऋषींनी वेदमंत्राची रचना केली एवढे मानता येते. ही सरस्वती महाभारत काळी लुप्त झाली हे व्यासांच्या विधानावरून कळते. बलरामाने पृथूदक या सरस्वती तीरावरील भरपूर पाणी (पृथु+उदक) असणाऱ्या क्षेत्री पितृतर्पण केले. व्यासांच्या शब्दात ती पश्चिमवाहिनी नदी तिथून अदर्शना म्हणजे अदृश्य आणि अन्तःसलिला म्हणजे जमिनीखालून वाहणारी झाली. म्हणजे ही घटना इ.स. पूर्व ३००० म्हणजे पाच हजार वर्षांपूर्वी घडली. महाभारतानंतर लगेचच कलियुगारंभ झाला. आता त्याचे बावन्नावे शतक चालू आहे.

कलियुगा आधी द्वापर आणि त्या आधी त्रेता युग झाले. रामायण आणि महाभारत या दोनच ग्रंथांना आपण इतिहास असे म्हणतो. त्या दोन्ही ग्रंथांचे कर्ते त्या इतिहासाचे लेखक आणि प्रत्यक्ष साक्षीदार होते असे आपण मानतो. वास्तविक ते दोघेही कोळी होते आणि ती दोन काव्ये म्हणजे कोळीगीतेच आहेत. यज्ञांचा आणि इष्टि म्हणजे कामनापूर्तीसाठी केलेल्या छोट्या यज्ञांचा पण उल्लेख या इतिहास ग्रंथांत आहे. पुत्रकामेष्टि यज्ञ दशरथाने

केला आणि त्याचे फळ म्हणून त्याला चार पुत्र प्राप्त झाले. रामाने अश्वमेध यज्ञ केला. आणि द्वापरयुगात धर्मराजाने राजसूय केला. कालिदासाच्या रघुवंशाप्रमाणे रघूने विश्वजित यज्ञ रामाच्या खूप आधी केला. त्यावेळेला वरतंतूंचा शिष्य कौत्स त्याच्याकडे याचना करायला आला वगैरे कथा लोकप्रिय आहे. कौत्सः प्रपेदे वरतंतुशिष्यः। कलियुगांत शिलालेखातून यज्ञांचे ऐतिहासिक संदर्भ सापडतात. कालिदासाच्या इंदुमतीस्वयंवर कथेत एका राजपुत्राचे वर्णन असे आहे की तो वारंवार इतके यज्ञ करी की प्रत्येक वेळी इंद्राय स्वाहा असे म्हणताच इंद्राला आहुती घ्यायला यावे लागे. तो इंद्रलोकी परत जाईपर्यंत पुन्हा 'इन्द्राय स्वाहा' ही हाक येई. काव्यमय भाषेत कालिदास म्हणतो. त्याने शचीचे म्हणजे इन्द्राणीचे कुरळे केस मन्दारपुष्पविरहीतच ठेवले. तिला फुले केसात माळून इन्द्राचे स्वागत करायला अवसरच दिला नाही. 'शच्याः चिरं पाण्डुकपोल (गोरेगाल) लंबान्। मन्द्रारशून्यान् अलकान् चकार।' तात्पर्य कालिदासाच्या काळापर्यंत म्हणजे कलियुगाच्या तिसऱ्या सहस्रकाच्या अंतापर्यंत यज्ञसंस्था भरभराटीत होती.

सत्ययुगातले ठोस पुरावे काही उपलब्ध नाहीत. द्वापरयुगानंतर म्हणजे कलियुगाच्या प्रारंभी पांडवांचा नातू परीक्षित आणि त्याचा मुलगा जनमेजय इथपर्यंतच्या यज्ञांच्या इतिहासाची नोंद आहे. तक्षक नाग, जनमेजयाचे सर्पसत्र म्हणजे ज्यात सर्पांची आहुती दिली गेली असा दीर्घकाळ चालेला यज्ञ इ. उल्लेख आहेत. त्यावरुन मराठीत म्हण पडली आहे. इंद्राय तक्षकाय स्वाहा। तो तक्षक इंद्राच्या पाठीमागे लपला. त्यामुळे इन्द्राला नव्हे तर इंद्राची आहुती देणारा मन्त्र त्या पुरोहिताने म्हटला. मराठीतले चर्चासत्र, सत्रन्यायाधीश हे शब्द यज्ञसत्रावरून आलेले आहेत.

तर कलियुगाच्या आरंभापासून इ.स.च्या पहिल्या सहस्रकापर्यंत यज्ञसंस्थेला राजाश्रय होता हे इतिहाससिद्ध आहे. मात्र हळूहळू यज्ञसंस्था मागे पडत चालली असावी.

आगम धर्म म्हणजे काय हे याठिकाणी समजून घेणे आवश्यक आहे. मंदिरान्तर्गत मूर्तिपूजा ही ज्याच्या केंद्रस्थानी आहे असा हिंदुधर्माचा प्रवाह. याचा उद्गम आणि विकास इतका इतिहासदृष्ट्या निश्चित आहे की निगम धर्मापेक्षा नेमकी उलट याची स्थिती आहे. त्रेतायुगात रामराज्याभिषेकानंतर श्रीरामांनी आप्तेष्टांना भेटी देऊ केल्या. त्यावेळी विभीषणाने त्यांच्या पूजेतली शेषशायी विष्णूची मूर्ती मागितली. ती घेऊन तो लंकेला निघाला. मात्र वाटेत म्हणजे अंदाजे १५०० कि.मी. वर कावेरी तीरावर चंद्रपुष्करिणीमधे तो माध्याह्न स्नानासाठी विमानातून उतरला आणि त्याने ती मूर्ती तीरावर ठेवली. ज्यावेळी ती तो उचलू लागला तेव्हा ती तो उचलू शकला नाही. तो जेव्हा गडबडा लोळून शोक करू लागला. त्यावेळी देवाने त्याला सांगितले की हे स्थान (त्रिचनापल्ली जवळचे कावेरीमधील बेट) रम्य आहे. मी इथेच पहुडलेला राहीन. पण माझी दृष्टी तुझ्याकडे

असेल (शयानोऽहं रंस्ये त्वामभिर्वाक्ष्य च। लंकां गच्छ निशाचर।) ही रामायणकालीन इतिहासग्रंथातील कथा आहे. (इथे निशाचर हे राक्षस या अर्थी बिभीषणाचे संबोधन आहे.) आम्ही प्रत्यक्ष श्रीरंगमच्या रंगनाथांच्या दक्षिणाभिमुख मंदिराच्या गर्भगृहासमोर होकायंत्र धरून त्याचा पडताळा पाहिला. होकायंत्राची सुई दक्षिणेच्या किंचित् पूर्वेला कळते. नेमकी आजची श्रीलंका त्रिचनापल्लीच्या किंचित् आग्नेयेला आहे. रंगनाथाची मूर्ती गाभाऱ्याच्या पश्चिमेकडील भिंतीजवळ आहे. पाय पूर्वेकडे आहेत. द्वार दक्षिणेकडे आहे. (श्रीरंगपट्टण येथील रंगनाथाच्या देवळाचे द्वार पूर्वेकडे आहे.) हा अपवाद नक्कीच विभीषणासाठी आहे. कारण रंगनाथाची दृष्टिरेषा पश्चिमेकडून निघून गर्भगृहातून आग्नेय दिशेला वाढवली तर ती श्रीलंकेच्या कोलंबो, जाफना, बट्टिकोलुवा यापैकी कुठेतरी नक्की पोचेल. ही हकिगत पांचरात्र आगमाच्या ईश्वर संहिता आणि परमेश्वर संहिता (अं. इ.स. ६००/७००) या काळातली आहे. श्री रंगनाथाच्या आज्ञेप्रमाणे विभीषणाने त्या मूर्तीभोवती मंदिर बांधले, अग्रहार म्हणजे पुजाऱ्यांची वसतीस्थाने बांधली अशी अख्यायिका आहे. आजमितीस श्री. कृष्णम्माचार्य अनंताचार्य यांच्यासारखे काही पांचरात्र आगम परंपरेतील अर्चक म्हणजे पुजारी या अग्रहारात कित्येक पिढ्यांपासून राहात आले आहेत.

तर त्रेतायुगात मंदिरसंस्था असल्याचा हा पुरावा आहे. परंतु पांचरात्र या शब्दाचा पहिला उल्लेख महाभारताच्या मोक्ष पर्वात आढळतो आणि त्याचा पर्याय सात्वत हा शब्द भीष्मपर्वात स्पष्टपणे आला आहे. वेदाध्ययन जुन्याकाळी चारी वर्णाना खुले नव्हते. पण व्यासांनी स्पष्टपणे उद्घोषित केले आहे कीः ब्राह्मणैः क्षत्रियैः वैश्यैः शूद्रैश्च कृतलक्षणैः! अर्चनीयश्च सेव्यश्च। म्हणजे वासुदेवाची पूजा चारी वर्णातल्या लोकांनी करावी. कोणत्या पद्धतीने? सात्वतं विधिमास्थाय। कोणाची पूजा करायची? वासुदेवाची. प्रथम कोणी केली? गीतः संकर्षणेन यः। संकर्षणानें म्हणजे बलरामाने. तर या पूजा पद्धतीचा उद्गाता कोण? पांचरात्रस्य कृत्स्नस्य वक्ता नारायणः स्वयम्। या परंपरेची सुरुवात केव्हा झाली. द्वापरस्य युगस्य अन्ते। आदौ कलियुगस्यच। द्वापार युगाच्या अखेरीस आणि कलियुगाच्या आरंभी पांचरात्र संहितांमध्ये या धर्माच्या प्रसाराची परंपरा विवस्वान्-मनु-इक्ष्वाकु अशी आहे. नेमकी हीच परंपरा गीतेच्या ४थ्या अध्यायात आहे.

(लेखाचा उर्वरित भाग..... पुढील अंकी)

**– डॉ. प्रभाकर आपटे**
बुद्धदेव विहार, हिलगार्डन,
टिकुजीनीवाडी जवळ,
ठाणे – ४००६१०
भ्रमणध्वनी : ७०२१७७६५१५

•••

समर्थ रामदास स्वामी दासबोधात उत्तम पुरुषाचे लक्षण सांगतात. 'मरणाचे स्मरण असावे। हरिभक्तीस सादर व्हावे। मरोनि कीर्तीस उरवावे । येणें प्रकारें।।'

जगणे आणि मरणे ह्या एकाच नाण्याच्या दोन बाजू होत. ज्या क्षणी मनुष्य जन्माला आला, त्याच क्षणी त्याची मृत्यूची वेळ, स्थळ नक्की झालेले आहे. जीवन म्हणजे प्रतिक्षणी मृत्यूकडे चाललेला प्रवास होय. प्रवासाला निघताना आपण किती आनंदाने उत्साहाने तयारी करतो. तीच तयारी म्हणजे समर्थ म्हणत आहेत 'हरिभक्तीस सादर व्हावे'. ही हरिभक्ती आदरपूर्वक देहात कशी भरायची तर त्याचेही कोडे उलगडून दाखवले आहे. 'प्रभातें मनीं राम चिंतीत जावा।' पहाटे उठून दररोज न चुकता ठराविक वेळी राम-चिंतन म्हणजे आत्मारामाचे ध्यान करावे, त्याची मानस पूजा करावी. स्नान, मूर्तीपूजा, जप, पारायण इत्यादि साधनांनी मन भक्तीत रमवावे. अन् काही फलाहार (न्याहारी) करून आपले स्वकर्म-विहित-नित्य कर्तव्यकर्म करीत रहावे. उदा. विद्यार्थ्याने अभ्यास करावा. गृहिणीने गृहकर्म करीत रहावे, कुटुंबकर्त्याने सर्वांच्या भरण पोषणासाठी जो आपला नोकरी/व्यवसाय असेल तो प्रामाणिकपणे करावा.

अर्थात उत्तम पुरुष म्हणजे 'साधक' स्त्री वा पुरुष समर्थांना अभिप्रेत आहे. तेव्हा त्यांचेसाठी पुढे 'वैखरी राम आधी वदावा।' हे सांगून मुखाने रामनाम व हाती काम असे अपेक्षित आहे. अशी जर जीवन-चर्या बनली तर आपोआप 'मुखी नाम हाती काम अन् हृदयी राम' हे सूत्र गवसेल. म्हणजे मग 'सदाचार हा थोर सांडो नये तो।' - सदाचार हा सहज अंगवळणी पडतो अन् असाच सामान्य साधक 'जगीं/जनीं तोचि तो मानवी धन्य होतो।' असे घडतेच घडते.

लोकमान्य टिळक, सावरकर, आगरकर, छत्रपती शिवाजी महाराज, विवेकानंद ह्या साऱ्यांची आयुष्ये पाहिली तर हेच सिद्ध होते. हे सारे देहाने मरण पावले पण (मरोनि कीर्तीस उरवावे) कीर्तीरुपाने ते आजही आपल्या भारताचे प्रेरणा स्रोत, मानदंड म्हणून आहेतच.

मरण, मृत्यू ही एकच गोष्ट सत्य आहे. संत ज्ञानेश्वर, आदि शंकराचार्य यांचे आयुष्य अगदी अल्प होते. ज्ञानेश्वर माउलीने समाधी स्वीकारली. ज्ञानेश्वरी लिहून अखिल विश्वासाठी 'पसायदान' मागून तृप्त शांत स्थितप्रज्ञतेने त्यांनी आनंदाने देह सोडला. तर शंकराचार्यांनी हिंदू सनातन वैदिक धर्माची घडी बसवून अद्वैत वेदांत सर्वांना समजाऊन देऊन अनेक गेय भक्तीपूर्ण रचना करून आपला जन्म 'कृतार्थ' झाला या भावनेने देह केदारनाथला सोडून दिला अन् ह्या दोन थोर ज्ञानी भक्तांनी 'देह म्हणजे मी नाही, आत्मा म्हणजे मी - अहं ब्रह्माऽस्मि' हे केवळ शब्दांनी नव्हे तर कृतीनेही सिद्ध केले. 'देहेबुद्धि ते आत्मबुद्धि करावी' - हा विचार ज्या प्रकाराने आपल्या साहित्यातून मांडला तसाच तो जगून-मरूनही दाखवला.

रामायणात मृत्यूने जीवन सफल सुंदर झाले ते मुख्यत्वें दशरथ, शबरी, जटायू, शरभंग इ. अगणित भक्तांचे लाखो वर्षानंतरही रामायणातील प्रत्येक पात्र आज अजरामर झालेले आहे. अगदी खलनायक रावणही – विरोध भक्तीने याच प्रकारे धृतराष्ट्र, दुर्योधन, दुःशासनादि कौरवही आपण आज 'खल' दुष्ट म्हणूनच आठवतो अन् अनेक संकटांना निर्भयपणे धर्माच्या चौकटीत राहून तोंड देणाऱ्या पांडवांचा आजही गुण–गौरव करतो इतकेच नव्हे तर पांडवांचा कैवारी बनलेला प्रत्यक्ष परब्रह्म श्रीकृष्ण त्यांच्या यज्ञात उष्ट्या पत्रावळ्या काढतो, अर्जुनाचा सारथी बनून घोड्यांना खरारा करतो.

एकनाथांकडे हाच परमात्मा १२ वर्षे श्रीखंड्या बनून पाणी भरतो, जनाबाईला दळण–कांडण करायला मदत करतो व तिची लुगडी धुतो.

याचाच अर्थ भक्तीतले हे सामर्थ्य देवालाही 'दास' बनविते. अर्थात जेव्हा मनुष्य समजून जाणून व मानून प्रेमादर पूर्वक भगवंताशी काया वाचा मने जोडला जातो तेव्हाच!

सादर हरिभक्ती म्हणजे डोळस भक्ती, ज्ञानी भक्त! आई मुलासाठी अक्षरशः मरण यातना–प्रसूती वेदना सोसते, तो मुलगा/गी मोठा होईपर्यंत त्याच्यासाठी अनंत कष्ट सोसते. पण प्रेमाने, निरपेक्षतेने. असे जो भक्त भगवंतासाठी त्वमेव माताच पिता त्वमेव... हे केवळ शब्दातून नव्हे तर कृतीतून सिद्ध करतो. तेव्हा ती भक्ती सादर हरिभक्ती बनते.

लक्ष्मणाप्रमाणे सदैव रामाजवळ राहून रामसेवा करणारा सगुण भक्त असो, वा भरताप्रमाणे दूर राहून स्वकर्तव्य निष्ठेने बजावत मनात सदैव रामस्नेह जागविणारा निर्गुण भक्त असो तो कीर्तिवंत होतोच.

जटायूसारखा नीच योनीतला पक्षी सीतेच्या संरक्षणात अपयशी ठरूनही भक्त म्हणून अमर झाला, तो 'न मे कर्मफले स्पृहा' या जाणीवपूर्वक भक्तीने तर प्रेम, प्रतीक्षा व परमार्थ (प्रयत्न) रामांच्या स्वागताची तयारी करणारी बालपणापासून वृद्धावस्थेपर्यंत अडाणी निरक्षर शबरी सायुज्ज्य मुक्तीची अधिकारिणी ठरते.

शेवटचा दिस गोड व्हावा असे ज्याला वाटत असेल त्याने हे मरणाचे स्मरण ठेवणे अत्यावश्यकच आहे. मरण म्हणजे देहाचे नाश पावणे. ती तर या सुंदर अशा आत्म्याची खोळ आहे केवळ. आत्मा हा अजर अमर व्यापक आहे. उलट त्याचे विस्मरण हेच मरण होय. म्हणून तर निद्रेलाही मृत्यू प्रलय म्हणतात. 'ईश्वर अंश जीव अविनाशी/चेतन अमल सहज सुखराशी।' हे आपले देहाच्या खोळीत लपलेले सहज सुंदर सुख स्वरूप आहे. ते तेजस्वी, प्रकाशमान ठेवायचे तर रामनामाचा कौस्तुभमणी मुखात सतत ठेवणे हाच एकमेव उपाय होय. कलियुगातले हे सर्वात सोपे कुठेही, केव्हाही, कसेही करता येण्यासारखे साधन होय.

मरणाच्या चिंतेचा, व्यथेचा नव्हे तर स्मरणाचा नेमका, नेटका व अचूक उपाय 'मुखी राम नाम, हाती (कर्तव्य) काम व हृदयीं श्रीराम' – हीच सादर हरिभक्ती होय.

**– सौ. रेखा पटवर्धन**
(प्रज्ञाशिष्या रामदासी)

## ''भिऊ नकोस, मी तुझ्या पाठीशी आहे'' 

**वसंत गोडबोले**

अनंतकोटी ब्रह्याण्डनायक राजाधिराज योगिराज अक्कलकोटनिवासी स्वामी समर्थ महाराजांचे हे अभय वचन सर्वश्रुत आहेच. स्वामींच्या प्रत्येक मठात हे वचन ठळकपणे लिहिलेले दिसतेच व त्यांच्या चित्राखाली पण ते असतेच. स्वामी समर्थ म्हणजे हे वचन व हे वचन म्हणजेच स्वामी समर्थ इतके एकरुपत्व त्यात आहे. या वचनाला अभयवचन हे नाव /संबोधन देण्याचे प्रयोजन अगदी सहज समजण्यासारखे आहे हे ते वाचल्याबरोबर लक्षात येते. त्या वचनाप्रमाणे स्वामी सतत पाठीराखे आहेत हे लक्षात आले तरी त्यातील भावगर्भगूढार्थ लक्षात येणे आवश्यक आहे कारण हे प्रत्यक्ष दत्तावतारी अवधूत परब्रह्म स्वामींचे वचन आहे. त्यावर चिंतन करणे व मनन करणे आवश्यक आहे. कारण थोर संत महात्मे जे बोलतात ते सूत्ररुप असते. अगदी मोजक्या गूढार्थी शब्दात ते असते व म्हणूनच त्यामागील हेतू जसजसे चिंतन करावे तसतसा स्पष्ट होऊ लागतो व हेतू स्पष्टता जेवढी अधिक तेवढे जीवन सफल बनविणेचे प्रयत्न अधिक फलदायी वा सार्थकी.

सामान्यतः माणसाला भीति ही वाटतच असते. ही भीति उत्पन्न होण्याची कारणे अनेक असली तरी प्रमुख प्रकार दोनच आहेत. ज्यात ही सर्व समाविष्ट होऊ शकतील. ती दोन प्रमुख कारणे म्हणजे (अ) व्यावहारिक (ब) पारमार्थिक वा अध्यात्मिक. व्यावहारिक कारणामध्ये कर्म केल्याच्या परिणामाची भीति, कर्म न केल्याच्या परिणामाची भीति दुसऱ्यांच्या कर्मामुळे वाटणारी भीति, आर्थिक भीति, रोगभयभीति /स्वास्थ्य भीति इ. इ. अनेक उपप्रकार आहेत. मायेपोटीही अनेकदा मनात भय निर्माण होते. समानात राहतांना अनेकदा असे प्रसंग निर्माण होतात की मन भयभीत होते. काळजी मायेपोटी निर्माण होते व त्यातूनच भय उत्पन्न होते. एकलेपणाची जाणीवही त्यातून भीती निर्माण करते. निसर्गामुळेही भय निर्माण होते. षड्रिपूही त्यास अपवाद नाहीत. याशिवाय आपल्या वकूबाची जाणीवही कारण ठरू शकते. इतर प्राणीमात्रांपासून तसेच पंचमहाभूतांपासूनही भय निर्माण होऊ शकते. ''वाजे पाऊल आपले। म्हणे मागे कोण आले'' अशीही मनाची अवस्था होऊ शकते. आपल्याच सावलीचीही भीति वाटते. गर्द रानातून पाऊल वाटेने जातांना मनात वन्यपशूची भीति असते. भयाण काळेख, प्रचंड वादळ इ.इ. जेव्हा मनुष्य सापडतो तेव्हाही मनात एक प्रकारची भीति असते. पट्टीचा पोहणारा असला तरी अथांग जलाशयात वा भोवऱ्यात सापडून हतबल झाला की त्याचे मन एका अनामिक भीतीने गारठते. शक्ति जसजशी क्षीण होत जाते तसतशी भीति वाढू लागते. आधिभौतिक आधिदैविक अशा या व्यावहारिक भीतीच्या दोन तऱ्हा/प्रकार आहेत.

मनुष्य गरीब असो वा श्रीमंत तो भयमुक्त असू शकत नाही. गरिबांची भय वाटण्याची कारणे वेगळी श्रीमंतांची वेगळी असतात पण कोणत्या ना कोणत्या प्रकारची

प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष /अनामिक भीति त्यांना वाटतेच. चिंता ही भयउत्पत्तीची कारक असू शकते. हितशत्रूंची भीति तर सदा असतेच. आपले बरे कोणाला बघवणार नाही ना ही मनात घर करून असणारी गोष्ट असते. सज्जन सदाचरणी लोकांनाही हे भय असतेच, तर मग राजकारणी, दुष्ट माणसांना तर ते सदैव भोवताली आहे असे वाटत असते. कोणते संकट कोणावर कधी, कसे, कोणत्या स्वरूपात, चालून येईल हा अंदाज करता येणे अशक्य. षड्रिपू हे ही भय उत्पन्न करणारे असतात. कारण आधिभौतिक जीवनात यांच्याच आहारी जाऊन माणसे वागतात तेव्हा त्यांच्या हातून ज्या काही चुका घडतात त्याची जाणीव झाली की परिणामाची भीति मनात मूळ धरू लागते. सायंकाळी दृष्ट काढणे, बाळाला तीट लावणे इ. प्रकार जे केले जातात त्यात तर अनामिक आधिदैविक भीतिचे कारण असते. या आधिदैविक गोष्टी म्हणजे नजर लागणे, पितरबाधा, करणी इ.इ. त्यांचे पुरावे वैज्ञानिक कसोटीवर देता येत नाहीत. पण त्यांचा पगडा मनावरुन उतरतही नाही.

व्यावहारिक भीतीपैकी आधिभौतिक भीतिवर माणूस उपाययोजना करु शकतो तरी त्याच्या पूर्ण यशस्वितेची ग्वाही देता येत नाही. कारण पुष्कळदा ज्याचा आश्रय घेतो तेच बळी घेणारे ठरते. निर्भय पूर्णपणे होणे जमतच नाही. करावे एक व्हावे भतेच असेही घडते. वैज्ञानिकांनासुद्धा भीति सोडत नाही. एक अनामिक हुरहुर मनात भीति उत्पन्न करते. भीतिमुक्त ठिकाण वा आश्रय तो बघत असतो. भोवती अंगरक्षक ठेवून निद्रा घेणारे राजे रजवाडे हे झोपेचेही सुख उपभोगू शकत नसत. व्यसनाधीन माणसे व्यसनांपोटी शरीर जीर्ण झाल्यावर काय होईल या भीतिने ग्रासलेले असतात.

'अखण्ड असावे सावधान' हे स्वामी रामदासांनी याच करता उपदेशिले आहे. कारण भीति/संकट कधी येईल हे सांगता येत नाही. निसर्गाची अवकृपा हे तर शेतकऱ्यांच्या मनावरचे कायम भय सावट असते. हे आपण आजही अनुभवतो आहोत. परमार्थिक भय म्हणजे जे वाममार्गी उपासक असतात. तयांना त्याच उपास्य देवतेची मनात भीति वाटत असते. सत्शील उपासकांना हे भय वेगळ्या प्रकारचे असते ते म्हणजे त्या देवतेच्या उपासनेत काही त्रुटी तर नाही ना राहिल्या इ.इ. त्या दैवताचा कोप होऊ नये यासाठी तो सदैव प्रयत्न करत असतो. नवस सायास इ. प्रकार यात येतात ते याचेच प्रतीक आहेत.

तेव्हा या जगात जे जे चर आहे त्यांना भय आहेच. प्राण्यांनाही शत्रू असतात त्यांनाही भयमुक्त जीवन जगता येत नाही. जीवो जीवस्य जीवनम् हे त्रिकालाबाधित सत्य आहे. पण प्राण्यात व मानवात फरक आहे. या लेखात विचार आहे तो मानवी जीवनाचा तसे पाहिले तर प्राण्यांपासून माणसाला व माणसांपासून प्राण्याना भय आहेच. प्राण्यांना बुद्धी वैभव नाही त्यामुळे त्यांची उत्क्रांती नाही म्हणून आपण फक्त मानवाचाच विचार करणार आहोत. तसे प्राण्यांसाठी जरी आपण अभयारण्ये निर्माण करतो पण खरे तर त्यात आपलाच स्वार्थ असतो. मानव मग तो कोणत्याही जाती, धर्म, वंश, पंथ, देश याचा असो त्याला कोणत्या ना कोणत्या प्रकारचे भय असतेच. अटळ जीवनसंघर्षात भीति ही

येणारच हे सत्य आहे. भीतिने ग्रस्त मानव त्यापासूनचे मुक्तीचे मार्ग खुंटल्यावर तसेच भविष्याचे अनाकलनीय स्वरुप उमगल्याने तो शेवटी संत/देव यांच्या भजनी लागतो हे उघड सत्य आहे. आर्त, दीन, श्रीमंत सगळेच अशा मार्गाने जातात. यावेळी त्यांची फसगत ढोंगी, दांभिक, बुवाबाजी करणाऱ्यांकडून होत असते. फक्त खरे संत याला अपवाद असतात.

श्री स्वामी समर्थ हे तर साक्षात दत्तावतार त्यांच्याकडे अनेकांची रीघ असायची ती दुःखहरण, सुखप्रदान, मनोरथपूर्ती इ. साठी आर्त भक्तांची शारीरिक, प्रापंचिक, आर्थिक इ. अनेक अडचणी /दुःख यापासून मुक्ती व्हावी म्हणून त्यांची कृपा संपादण्यासाठी स्वामी समर्थ हे जाणून होते की कोणते भक्त खरे व कोणते खोटे आहेत. कुणाची भक्ती दांभिक आहे व कुणाची खरी आहे. त्यामुळे त्यांची कृपा त्यांच्यावरच होत असे जे त्यांना तनमनधन समर्पण करीत कायावाचामने भक्ती करीत. ज्यांना स्वामी समर्थ आले म्हणत व त्याच्यावर कृपाछत्र धरी. अर्थात अशा निष्ठावंत भक्तांसाठी श्री स्वामी समर्थ यांनी हे ''भिऊं नकोस, मी तुझ्या पाठीशी आहे'' हे आश्वासन दिले आहे हे सत्य आहे. निष्ठावंत ज्याचा भाव। त्यासी पावतसे देव। उपास्यापदी भाव उपासके ठेवावा। हे संत दासगणूंनी गजानन विजय ग्रंथात लिहिले आहे ते सार्थ आहे. सत्याचा वाली परमेश्वर असतोच. तेव्हा या निष्ठावंत भक्तांसाठी स्वामी सदैव पाठीराखे होणार यात शंका नाहीच. पण या वचनाचा अर्थ चिंतन केले असता वरवर वाटतो तेवढा सोपा सहजभावी नसून त्यामागे श्री स्वामी समर्थांना काय अभिप्रेत आहे ते उलगडू लागते. स्वामी माझे पाठीशी आहेत असे समजून कोणी आक्रस्ताळी अविवेकी, अनैतिक, असंबद्ध कृत्ये करील तर त्याला त्याची शिक्षा स्वामी देतील त्याची भलावण वा पाठराखण वा अभयदान करणार नाहीत. संकटाचा सामना करणारे मनास बळ यावे, विषाद नष्ट व्हावा, चैतन्य भरावे, उर्मी यावी, हिंमत यावी यासाठी त्यांनी ''तू भिऊ नकोस'' असा प्रथम दिलासा दिला आहे. मन खंबीर नसले तर शरीर स्वस्थ धडधाकट असूनही उपयोग नाही. कचखाऊ मन संकटाशी मुकाबला करणार कसे? तेव्हा ही मनाची अवस्था त्यांनी प्रथम या आश्वासनाद्वारे सुधारली आहे. याचा अर्थ असा नाही की भक्ताने त्याच्या मर्यादा / वकुब / क्षमता न जाणता संकटावर बेलगाम तुटून पडावे. त्याची मत ''वेडात मराठी वीर दौडले सात'' अशी होऊ शकेल. सारासार विवेक बुद्धी व श्रद्धा यांची सांगड येथे स्वामी समर्थांना अभिप्रेत आहे. स्वामी पाठीशी आहेत मी कशाला प्रयत्न करु, स्वामी बघून घेतील ही आलस्य वृत्ती पण येथे उपयोगाची नाही. ''जो स्वयेचि कष्टत गेला तोचि भला'' हे समर्थ रामदासांचे वचन प्रयत्नवाद शिकवते. तसेच हे स्वामींचे वचन आहे. भीतीपायी प्रयत्न सोडू नकोस हे येथे ओघानेच येते. निर्भय मन निशंकपणे संकटास सामोरे जाते व विवेक जागृत असला की त्यावर मात करण्याचे मार्ग ते शोधू लागते. आता हे नैसर्गिक आहे की माणसाला कोणतातरी आधार हवा असतो. त्यामुळे त्यास जोर येतो. आपल्यामागे आपणास मदत करणारे कोणी असावे ही अपेक्षा स्वाभाविक आहे. ज्यांचा कोणी पाठीराखा नसतो त्याचा

वाली भगवंत असतो. कारण तो सत्याचा प्रतिपालक आहे व सद्भक्तांचे सहाय्य करणेस कटिबद्ध /वचनबद्ध आहे. ही एक मानसिक बळ प्राप्त करून देणारी गोष्ट आहे. मनाचे सामर्थ्यवर्धन त्याने होते व भीतीची उग्रता / व्याप्ती याचे काही वाटेनासे होते. हा भरवसा जर स्वामी समर्थासारख्या योगेश्वराचा असेल तर त्या पाठिंब्यास / भरवश्यास अनमोल अर्थ आहे. कारण ती पाठीराखी शक्ति अजोड अजेय, अतर्क्य, अगम्य, अगाध आहे ती अक्षय आहे, कालातीत आहे, ती सच्चिदानंदी शक्ती आहे. त्यामुळे तो भक्तांचा घात करणार नाही त्याला वाऱ्यावर सोडणार नाही तर त्याला यश मिळवून देईल वा त्याचे संकट / आपत्तीपासून रक्षण करील.

स्वामींना आळशीपणा आवडत नसे. 'प्रयत्नांती परमेश्वर' जे म्हणतात तेच स्वामींना अभिप्रेत होते. माणसाने भौतिक प्रयत्न करावयासच हवेत. 'असेल माझा हरी तर देईल खाटल्यावरी' असे म्हणून दैववादीपणाची कास धरणारे स्वामींना आवडत नसत. अर्थात प्रयत्न करणारा माणूस मनामध्ये यशप्राप्तीसंबंधी साशंक असतो. कारण अकल्पितपणे दत्त म्हणून पुढे येऊन ठाकणारी संकटे. तेव्हा या संकटांपासून त्याला मुक्त करणारे गुरुकृपाछत्र श्री स्वामी समर्थ या वचनाद्वारे देतात ते 'मी पाठीशी आहे' या आश्वासनाने. भित्यापाठी ब्रह्मराक्षस असो वा नसो पण भक्तापाठी स्वामी समर्थ सत्यप्रमाण आहे.

प्रयत्न करणारा व स्वामींठायी अनन्य भक्तिभाव असणाऱ्याचे जीवनरथसारथ्यच स्वामी करत असतात. त्यामुळे त्याला मार्गदर्शन आपोआपच मिळते. शिवाय पाठीशी स्वामी शक्ति उभी असते व ती येणाऱ्या संकटांचे निवारण करते. हे अनन्यभक्तीभावाचे चिलखत मात्र जो भक्त घालील त्यालाच हा अनुभव येईल. हे चिलखत घातले की भीति नष्ट होणार. अनन्याश्चिंतयन्तो मां ये जना पर्युपासते। तेषां नित्याभियुक्तांना योगक्षेमं वहाम्यहम्।। हे स्वामींचे आश्वासन म्हणजे या वचनाचेच दुसरे रुप आहे. स्वामी योगक्षेम चालवतील महणजे अन्न वस्त्र निवारा त्याला गरजेइतका नक्कीच मिळेल. वभैव नव्हे हे लक्षात घ्यावे. भिऊं नकोस हे स्वामींचे सांगणे म्हणजे पाठीवर थाप मारुन पुढे हो असे सांगणे आहे. याचा अर्थ विपरीत घेऊ नये. नीतिबंधने धर्मनिष्ठा, सुविचार त्यागून अभद्र कृत्ये कोणी स्वामी भक्त करु म्हणेल व स्वामीं पाठीराखे आहेत म्हणून असले अविवेकी अविचारी साहस करील, गरिबांवर अन्याय करील, समाजद्रोही, धर्मद्रोही बनेल व स्वामी पाठीशी आहेत असे समजेल तर ते चूक ठरेल.

कोणत्याही अपप्रवृत्तींची भीति न बाळगता जो संकटाशी झगडेल स्वामींवर श्रद्धा ठेवेल त्याचे पाठीशी स्वामींची अदृश्य शक्ति उभी राहीलच. मन चिंती ते वैरी न चिंती अशी मराठी भाषेत म्हण आहे. त्यामुळे मनास सदैव चिंता लागलेलीच असते व त्यामुळे मन सर्वदा खंबीर राहीलच याची खात्री नसते व अनामिक भीतिने ग्रासलेले मन देवदेवतांच्या भजनी लागण्याचा व भोंदू साधू इ. च्या नादी लागण्याचा /भरकटण्याचा संभव असतो. अशा वेळी योग्य ठिकाणी श्रद्धा ठेवल्यास नंतर पश्चात्तापाची वेळ येत नाही. स्वामी समर्थ यांचेसारखे लोकोद्धाराचे कार्य करणारे

संतमहात्मे अशी वेळ भक्तांवर येऊच देत नाहीत. कारण त्यांना कोणाकडून काहीच नको असते. ते लोकांतात येतात ते केवळ लोकांच्या कल्याणार्थ व अपप्रवृत्तीचा नाश करण्यासाठी 'यदा यदा हि धर्मस्य .... युगे युगे।।' या गीतेतील श्लोकाचा अर्थच हा आहे तेव्हा श्री स्वामी समर्थरुपेच भगवंताचा अवतार झालेला आहे. त्यांनी हे दिलेले अभयाश्वासन कदापीही व्यर्थ जाणार नाही. यात अभय आहे व कार्यप्रवृत्त होण्यासाठी निर्भय हो हा संदेश आहे. भक्तांची पाठराखण करण्याचे आश्वासन आहे. हा एक सुवर्ण संदेशच आहे.

'रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग। अंतर्बाह्य जग आणि मन' हे संत तुकारामांनीही सांगितले आहे. म्हणजेच जीवन संग्राम दोन स्तरांवर होतो. जगाशी व मनाशी व त्यामुळेच माणसाला भीति उत्पन्न होते. पुष्कळदा भीतिपायी अनवधानाने वा गांगरून जाऊन चुका होतात व माणूस अपयशाने धास्तीने खचतो. स्वामी समर्थ हे द्रष्टे योगी. मन खंबीर असले की 'पंगु लंघयते गिरिम्' हे जाणूनच त्यांनी हे वचन उद्गारले आहे. 'निभर्य व्हा' असे आपले पूर्वीचेच पंतप्रधान स्व. मोरारजी देसाई हे ही सांगत म्हणून स्वामींनी भीति वा न्यूनगंड बाळगू नकोस पुढे हो. कचरू नकोस हे सांगून त्याचे मनोबल वाढविले आहे. पुष्कळदा असे प्रत्ययास येते की सज्जनांनाही आपत्तीस सामोरे जावे लागते. त्यावेळी ते खचून जाऊ नयेत वा 'हेचि फळ काय मम तपाला' म्हणून सन्मार्गापासून परावृत्त होऊ नयेत म्हणून 'पाठीशी मी आहे' असा धीर दिला आहे. 'कृपाळू देव सदा सन्निध राहे। परी अल्प धारिष्ट्य तो पाहताहे' तेव्हा देवही भक्ताची पारख अशी करत असतो हे जाणून तोच सर्वशक्तिमान स्वामी रुपात आहे तो तुझे रक्षण करीलच.

याचा अर्थ असा विपरीत घेऊ नये की मी मृत्यूलाही भीत नाही स्वामी माझे पाठीराखे आहेत. मला मृत्यू येणारच नाही. हे लक्षात ठेवावे की स्वामी उत्पत्ती, स्थिती व लय या प्रकृती सूत्रात बदल करणार नाहीतच फक्त संकटे आली तर ते रक्षण करतील. अमरत्व देणार नाहीत भौतिक देहाला पण कीर्तिरुपे अमर करतील. आधिभौतिक व आधिदैविक संकटांपासून रक्षण करतील. पण आध्यात्मिक मृत्यूक्रम बदलणार नाहीत. तेव्हा या जगात स्वामीवर विश्वास ठेवून जो वागेल त्याला संकटापासून भिण्याचे कारण उरणार नाही. स्वामीकृपाछत्र त्याचेवर राहील व संकटापासून नुकसान होऊ देणार नाहीत.

भक्त कोठेही गेला तरी स्वामी त्याची पाठराखण करतीलच. कारण त्यांची लीलाच ही अर्तक्य आहे. अशक्यही शक्य करून दाखवतील. स्वामीकृपामृतस्तोत्रात तर हे स्पष्टच सांगितले आहे की खऱ्या स्वामीभक्ताला परलोकातही भय नाहीच. अशी ही भक्तवत्सल दयामूर्ती कारुण्यसिंधू स्वामी समर्थ देवता भक्तांना कल्पद्रुम. तेव्हा त्यांना संपूर्ण (काया वाचामने) शरण जावे व वाट पहावी या सुवर्ण वचनाची जीवनात येणारी नित्य प्रचीती.

**वसंत गोडबोले**
फ्लॅट नं.५, दीपाली अपार्टमेंटस्,
१२४, शनिवार पेठ (नेनेघाट),
पुणे - ४११०३०
भ्रमणध्वनी : ९४२३८५८८२३

## परस्पर बँकांत जमा झालेल्या रकमांचा तपशील

| Bank Name | Date | Particulars | Amount |
|---|---|---|---|
| TJSB | 05-04-2018 | KULKARNI DINKAR ORIG BR CD | 1,025.00 |
| TJSB | 24-04-2018 | CABB TR 1 SAMANT PANDU | 450.00 |
| TJSB | 24-04-2018 | BY CASH ORIG. BRCD =87 | 75.00 |
| TJSB | 24-04-2018 | NEFT VIDYAADHAR ANANT PAR | 225.00 |
| TJSB | 25-04-2018 | CASH RIG BR CD=23 | 1,000.00 |
| TJSB | 08-05-2018 | UPI / PAYMENT FROM PHONE PE | 375.00 |
| TJSB | 21-05-2018 | BY CASH ORIG. BRCD =70 | 500.00 |
| TJSB | 04-06-2018 | BY CASH ORIG. BRCD =6 | 450.00 |
| SBI | 23-04-2018 | INBMBS DONATION TR NITIN SHRINIVAS | 5,000.00 |
| SBI | 26-04-2018 | INT.TR 3692754765 MNT | 169.00 |
| SBI | 02-05-2018 | FIM MT FRR EF 1008279104576 0910A66931302 TR FROM PAY.INDIAN NETWOR | 305.00 |
| SBI | 04-05-2018 | CASH DEPO SELF | 600.00 |
| SBI | 09-05-2018 | NEFT IB KLO 464PNS IBKL 180509786993BHALCH | 1,000.00 |
| SBI | 21-05-2018 | NEFT CIT 1000000CITIN 18862722105 ANIKET | 2,000.00 |
| SBI | 21-05-2018 | NEFT UV IL 0554243* SAA358514480 NARAYAN GO | 1,000.00 |
| SBI | 24-05-2018 | OWN CHQ XFER DP 954260 | 300.00 |

वरील यादीत परस्पर बँकांत जमा झालेल्या रकमांचा तपशील दिला आहे. वरील तपशीलावरुन संदर्भ शोधता आला नाही. तरी संबंधित देणगीदारांनी कृपया संपर्क साधावा. प्रकाश दीक्षित– ९८१९६९३१९५ वा ९०८२९९०४३१. (Whatsapp)

### संस्कृत सुभाषित व त्या अनुषंगाने एक कथा

भाषासु मुख्या मधुरा-दिव्या गीर्वाणभारती
तस्यां हि काव्यं मधुरं-तस्मादपि सुभाषितम्।।
पृथिव्यां त्रीणि रत्नानि-जलं अन्नं सुभाषितम्
मूढैः पाषाणखण्डेषु रत्नसंज्ञा विधीयते।।

१) सर्व भाषांमध्ये मुख्य आणि मधुर अशी भाषा म्हणजे दिव्य-संस्कृतभाषा होय. त्या भाषेत काव्य अधिक मधुर व त्यातही सुभाषित अतीव मधुर आहे.
२) पृथ्वीवर तीनच रत्ने आहेत. ती म्हणजे पाणी-अन्न व सुभाषित. पण मूर्ख लोक दगडाच्या तुकड्यालाच रत्न म्हणून मान्यता देतात.)

दैनंदिन जीवनातील संघर्षांना सामोरे जात असताना पुढील पिढीवर चांगले संस्कार करण्यासाठी, त्यांना सुसंस्कृत बनविण्यासाठी आज पालकांना पुरेसा वेळ नाही ते सहजपणे व्हावे यासाठी हा उपक्रम!

**'संस्कृत सुभाषित व त्या अनुषंगाने एक कथा'**

संस्कृत साहित्यातील 'पंचतंत्र' या ग्रंथाची रचनाही 'कथेतून प्रबोधन-उद्‌बोधन' या तत्त्वानेच झाली आहे. (राजपुत्रांना शहाणे-समर्थ घडविण्यासाठी सांगितलेल्या गोष्टी असेच पंचतंत्र या ग्रंथाचे स्वरुप आहे.)

हे नवीन सदर वाचकांना निश्चितच आवडेल असा विश्वास आहे. वाचकांपैकीही कोणी यात लेखक म्हणून सहभागी होऊ इच्छित असतील तर त्यांचे स्वागतच आहे किंवा वाचकांनी अशी सुभाषिते सुचवावीत. शक्य झाल्यास त्यांचाही समावेश पुढील एखाद्या लेखात करता येईल!

गोष्टींच्या बाबतीत तो खराही असतो. पण मानवाच्या इतिहासाच्या संदर्भामध्ये, सृजनशीलतेच्या क्षमतेच्या संदर्भात तो खरा असेल असं नक्कीच नाही. १५०० वर्षांपूर्वीची अजंठामधील भिंतीचित्रे किंवा हजार वर्षापूर्वीची दक्षिणेतील मंदिरे ही खूप जुनी झाली, पण ते निर्माण करणारे कल्पक हात जुने होते असं म्हणणं कलेवरच नाही तर त्या संस्कृतीवरही अन्यायकारक आहे. अडीच हजार वर्षापूर्वीचा भाषावैज्ञानिक पाणिनी हा जुना आहे, म्हणून भाषाविज्ञानामध्ये तो कमी दर्जाचा ठरतो का? आपल्या इतिहासामध्ये अशी अनेक उदाहरणे देता येतील.

यात सर्वात महत्वाचा प्रश्न आहे तो, या कलाकारांना किंवा पाणिनीला त्यांची कल्पकता, आणि सृजनतेला उत्तेजित करणारा पोषक समाजही त्याकाळी असणारच ना?

दुर्दैवाने वर्ग संघर्षाच्या सिद्धांताच्या विचाराची काविळ झालेले इतिहासकार मात्र असा विचार करायला तयार नाहीत. त्यांच्या दृष्टीने विशेषतः भारतीय इतिहास व धर्मसंकल्पनेच्या बाबतीत, 'वर्गसंघर्ष' हाच फक्त चालु होता. यातूनच हजारो वर्षाच्या अन्यायाच्या कपोलकल्पित कथांचा उगम होतो.

एकदा आपला इतिहास हा एकमेकांच्या उरावर बसून विषमता पसरवणारा होता असा ग्रह करुन सुधारणांना सुरुवात केली, की आपली आजची परिस्थिती निर्माण होते. सुधारणा म्हणजे तोडफोड नाही. कुठल्याही जुन्या व्यवस्थेमध्ये अनेक कोळीष्टक जमा झालेली असतात. चांगल्या वाईट गोष्टीही असतात. फक्त चांगली किंवा फक्त वाईट, अशी कुठलीच व्यवस्था नसते. म्हणूनच सुधारकाला मूळ व्यवस्थे मागील विचार समजून घेवून त्यावर आलेली जळमटे, अव्यवस्था दूर करायची असते. व्यवस्थाच संपुष्टात आणायची नसते. विशेषतः जी व्यवस्था सहस्त्रावधी वर्षाच्या अनुभवातून तावून सुलाखून निघालेली असते त्यांच्या बाबतीत तर हा विचार अतिशय गांभीर्याने करावा लागतो. कुठलीही व्यवस्था निर्माण करणे ही गोष्ट साधी नसते. साहजिकच अशावेळी नक्कल करण्याची प्रवृत्ती बळावते.

स्वातंत्र्यपूर्व काळात म्हणजे इंग्रजांच्या साम्राज्यवादाच्या काळात आपल्या सुधारणांमध्ये अनेक ठिकाणी ही प्रवृत्ती दिसून येते. इंग्रजांच्या साम्राज्यवादाच्या समर्थनार्थ, त्यांचा एक महत्वाचा दावा हा तुम्हाला सुसंस्कृत करण्याचा होता (Civilising mission). म्हणजे तुमची संस्कृती मागासलेली आहे, तुमचा धर्म अंधश्रद्धेने बरबटलेला आहे, हे पटवून देण्याकरता आधी सर्व व्यूहरचना करायची, आणि मग तुम्हाला जर का आधुनिक, प्रगतिशील व्हायचं असेल तर 'पाश्चात्य' आचार विचार आणि विज्ञानाचा स्वीकार करा हा पर्याय द्यायचा. यात 'असंबद्ध' चालीरीती किंवा 'अंधश्रद्धा' दूर

करण्यापेक्षा तुमच्या 'धर्म', व 'श्रद्धे'ला तिलांजली देणे हाच मुख्य हेतु होता. ख्रिस्तीधर्म प्रसारकांनी अत्यंत कुशलतेने नोकरशहांच्या माध्यमातून तो राबवला.

मेकॉलेने शिक्षणामध्ये आमूलाग्र बदल केला. त्याला हाडामांसाचे भारतीय, आणि आचार विचारांनी पाश्चिमात्य असे भारतीय बनवायचे होते. फार थोड्या काळात त्याला यात यश मिळाले. अनेक स्वकीयांमध्ये ही आपल्या व्यवस्थेबदद्ल 'न्यूनगंड' आणि साम्राज्यवाद अबाधीत ठेवण्याच्या विषाणूंची लागण झाली होती. दुर्दैवाने लोकहितवादी किंवा न्या. महादेव गोविंद रानडे यांना इंग्रजी राज्य ही ईश्वरी वरदान असल्यासारखे भासे ते यामुळेच.

आपल्या धर्म, आणि संस्कृती बद्दल झालेला 'अल्झायमर'चा रोग सगळ्यांना दिसत नसला तरी विष्णुशास्त्री चिपळुणकरांना मात्र त्यावेळीही तो दिसून आला होता. आपल्या 'काव्येतिहास संग्रह' या निबंधात ते लिहितात,

''आपल्या आजापणज्यांचे नांव वेळेनुसार आठवायचे नाही, रामायणातील, महाभारतातील अति प्रसिद्ध कथा किंवा मराठ्यांच्या इतिहासांतील ठळक ठळक गोष्टीही माहित नसतील, पण ग्रीस व रोमच्या इतिहासातील शक विचारा, किंवा इंग्लंडची वंशावळ म्हणायला सांगा, म्हणजे विल्यम् राजापासून तो तहत केसर-इ हिंदपर्यंत ।। तडक आगगाडी! मोरोपंताची सामान्य आर्या लागायची नाही, तुकारामाचे साधारण अवतरण लक्षात यावयाचे नाही; पण इंग्रजी कवितेतली काय ती सर्व माहिती! याप्रमाणेच धर्माचीही गोष्ट. आता कोणतेही ज्ञान संपादन केले तरी ते प्रशस्थच होय हे खरे, पण आपल्या घरच्या गोष्टींची गैरमाहिती असून माहिती काय ती हजारो कोसांवरच्या मुलखांची हे हास्यापद होय यांत संशय नाही, शिवाय जे आपल्या घराची दुरुस्ती करणार, व त्यास सुधारणेची कला आणणार, त्यांस तर वरच्यासारखा दिव्याखाली अंधार अगदीच उपयोगी नाही. तर मॉरिस साहेब सांगतील तो आमचा इतिहास, मेकॉलेबाबा सांगतील ती आमची नीति, डॉ. विल्सन सांगतील तो धर्म, ही लज्जास्पद स्थिती आजपर्यंत जी चालत आली... तीच पुढे चालु नसावी असे ज्यांच्या मनात असेल त्यांनी हल्ली प्राचीन विद्येच्या उज्जीवनार्थ जे प्रकृत पुस्तकासारखे उद्योग आमच्या काही देशबंधूंनी हाती धरले आहेत. त्यांचा चांगला पुरस्कार करणे अत्यंत आवश्यक होय.

नवशिक्षित भारतीयांची ही परिस्थिती का बरे झाली होती?

याचे एक मुख्य कारण म्हणजे, भारतीयांचे परंपरागत शिक्षण हे 'जुने' आणि 'उपयुक्त' नाही म्हणून बंद करा, आणि पाश्चिमात्य धाटणीचे 'नवीन' व 'उपयुक्त' शिक्षण त्यांना द्या या विचारामध्ये आहे. पाणिनी, कालिदास, यांचे हे सगळे ग्रंथ इतिहासजमा करण्यात आले, आणि त्यांच्या जागी धर्मप्रसारकांनी लिहिलेला भारताचा इतिहास आणि नवविज्ञान शिकवायला सुरुवात झाली.

जेम्स मिल या धर्मप्रसारकांने सहा खंडामध्ये "History of British India" हा भारताचा इतिहास १८१७ साली लिहिला. ICS अधिकाऱ्यांना तर याची पारायणे करावी लागायची पण नवशिक्षित भारतीयांनाही हाच इतिहास वाचावा लागे. पुस्तकाच्या आवृत्यावर आवृत्या निघू लागल्या. जेम्स मिल यांच्या पुस्तकातील ''General Reflections'' मध्ये हिंदूंबदद्ल त्यांनी नोंदवलेली निरीक्षणे 'वाचनीय' आहेत.

"Under the glosing exterior of the Hindu, lies a general disposition to deceit and perfidy... "the same insincerity, mendacity, and perfidy; the same indifference to the feelings of others; the same prostitution and venality"..."In truth, the Hindoo like the eunuch, excels in the qualities of a slave"... "dissembling, treacherous, mendacious, to an excess which surpasses even the usual measure of uncultivated society." "In physical sense, disgustingly unclean in their persons and houses"...

१८४०च्या सुमाराला त्याच्या नव्या आवृत्तीला H. H. Wilton या संस्कृत पंडिताने प्रस्तावना लिहिली आहे. मिल चे सर्व संदर्भ हे ख्रिस्ती धर्म प्रसारकांचे होते. यासंदर्भात विल्सन यांनाही हे मान्य करावे लागले आणि आपल्या प्रस्तावनेत ते म्हणतात,

"As missionaries...they see the emors and vices of a heathen people through a medium by which they are exaggerated beyond their natural dimension, and assume an enormity which would not be assigned to the very same defects in christians".

विन्सेंट स्मिथ (Vincent Smith) यांचे "The Early History of India" हे असंच भारताच्या इतिहासावरील एक प्रभावी पुस्तक. १९१४ साली त्याची ३ री आवृत्ती निघाली. भारत हे 'एकसंघ' राष्ट्र केव्हाच नव्हते, हा विन्सेंट स्मिथ यांचा प्रमुख सिद्धांत, इंग्रजांच्या साम्राज्यवादाचे समर्थन करण्याकरता मांडला गेलेला हा सिद्धांत. विन्सेंट स्मिथ यांनी भारतीय कलांवरही बरेच लिखाण केले आहे. त्यांच्या मते "India has never produced an artist of original genius in either painting or sculpture" (Imperial Gazetter, ii, 131).

या सगळ्याचा परिपाक होता तो म्हणजे आपला धर्मच आपल्या अधोगतीला कारणीभूत आहे या समजूतीचा. आपल्याकडील अनेक सुधारकांचाही रोख तोच होता. वास्तविक आपल्या धर्म या संकल्पनेमध्ये फार मोठी व्यापकता व सर्वसमावेशकता आहे. मानवी सृजनशीलतेला आड येईल असे कुठलेही प्रमाणवचन (dogma) त्यात नाही. वात्स्यायनाचे 'कामसूत्र' हे म्हणूनच आपल्याकडे रसिकतेने स्वीकारले गेले. खजूराहोच्या शिल्पांच्यासमोर कधीही धर्ममार्तडांची आंदोलने झाली नाहीत. उलट कलेचा एक उत्कृष्ट आविष्कार म्हणून त्याकडे पाहिले गेले. एवढेच कशाला, चार्वाक तत्वज्ञानही आपल्या दर्शनाचा एक भाग म्हणून अभ्यासले जाते. मतप्रवाह, मतभिन्नता ती लिहायला, वाचायला वा व्यक्त करायला धर्माची कधी आडकाठी आली नाही.

धर्माचा अर्थ, किती वेळा आचमन करा, किंवा पूजा करा असा केव्हाही नव्हता. इतर व्यवस्थांप्रमाणेच 'कर्मकांड' हा ही त्याचा एक भाग होता, पण कर्मकांड म्हणजेच धर्म नव्हता. ही संकल्पना ख्रिस्ती धर्म प्रसारकांना आकलन होणे अशक्य होते. त्यांच्याकडे त्यांचे चर्च आणि धर्मगुरु हेच त्यांच्या पंथांचे रक्षणकर्ते आणि मार्गदर्शक होते. सर्व समाजाचे भवितव्य त्यांच्या हातात असे. प्रबोधनपूर्व काळात त्यामध्ये प्रचंड भ्रष्टाचारही माजला होता. आपल्या वर्णव्यवस्थेतील ब्राह्मण हे त्यांना असेच पूजारी वाटले. पूजारी ब्राह्मण होते पण सगळे ब्राह्मण पूजारी नव्हते. दुर्दैवाने धर्माचे भाषांतर इंग्रजीमध्ये 'Religion' असे केले गेले आणि 'Religion' चा अर्थ 'धर्मा'वर लादला गेला.

'Religion मध्ये एक प्रेषित असतो व एक धर्म ग्रंथ असतो आणि त्या परिघातच त्या पंथाच्या सभासदाला वावरावे लागते. ख्रिस्ती धर्माचा प्रेषित 'येशू' हा आहे तर 'बायबल' हा त्याचा धर्मग्रंथ आहे. इस्लामचा 'मुहम्मद' हा प्रेषित आहे तर 'कुराण' हा धर्मग्रंथ आहे. आपल्याकडेही शैव, वैष्णव हे संप्रदाय हे 'Religion' संकल्पनेच्या जवळचे असले तरी ते हिंदू धर्माचे अविभाज्य भाग आहेत. याचे प्रमुख कारण म्हणजे 'धर्म' या व्यापक संकल्पनेमध्ये 'संप्रदाय' किंवा 'पंथ' असू शकतात, पण म्हणून त्या पंथाच्या परिघाबाहेर असलेले सभासद धर्मबाह्य होत नाहीत. एवढेच कशाला तर मानवा व्यतिरिक्त, सृष्टीमधील प्रत्येक घटकामध्ये त्याच चैतन्याचे सातत्य धर्मामध्ये अभिप्रेत आहे. अगदी अलिकडेपर्यंत आपल्याकडील सामान्य माणूसही 'जळी स्थळी, काष्ठी, पाषाणी' परमेश्वर आहे असेच मानत होता.

सर्व कला, साहित्य, भौतिक आणि आधिभौतिक संकल्पना या आपल्या व्यापक, सर्व समावेशक 'धर्म' विचाराच्या अविभाज्य भाग होत्या. जुडोख्रिस्ती पंथामध्ये या संकल्पनांमध्ये द्वंद होते. हिंदू चित्रकला आणि शिल्पांचे आकलन म्हणूनच त्यांना होऊ शकले नाही. पार्थ मिट्टर (Partha Mitter) या कला इतिहासाच्या अभ्यासकांनी आपल्या Much Maligned Monster या पुस्तकात याचा चांगला समाचार घेतला आहे. १६ व्या शतकातल्या प्रवाश्यांपासून, १९ व्या शतकातील तत्त्वज्ञ हेगेल ते रस्किन पर्यंत सर्वांनी भारतीय चित्रकला किंवा शिल्प, ख्रिस्ती विचारांच्या दृष्टीने बघितली. त्यांच्यामागिल भारतीय 'तत्वविचार' त्यांना समजू शकला नाही. मिट्टर यांची आपल्या पुस्तकातील प्रस्तावनेतील टिपणी बोलकी आहे,

"Arguably, Indian art presented a test case for the Western understanding of India, because it's aesthetic standards differed so much from those of the classical West. In the early periods of European exploration of Asia, travellers saw Hindu sacred images as infernal creatures and diabolic multiple limbed monsters.........what is remarkable is that the attitude persisted even into the modern period...........Thus, Hegele saw in the supposedly formless

images of Indian art an expression of Indian mentality which was identified by him as dreaming consciousness.......... Ruskin approved of the sense of colour and form of the native Indian craftsman but abhorred Indian sculpture, painting, and architecture as representing un-christian ethos"

दुर्दैवाने पाश्चात्य शिक्षणाबरोबर आपल्या धर्म संकल्पनेचे ही 'पाश्चात्यीकरण' झाले. 'व्यष्टी', 'समष्टी', 'ब्रह्म', 'आत्मा' या संकल्पना, पाश्चात्यांनाच नाही तर आपल्यालाही अनाकलनीय झाल्या.

सुदैवाने पाश्चात्य देशामधील शरीरशास्त्राचे अभ्यासक जेव्हा हिंदू संकल्पनांचा अभ्यास करु लागले, तेव्हा त्यांना भारतीय विचारांचे झालेले पाश्चिमात्यीकरण व त्यामधून निर्माण झालेला 'संभ्रम' प्रकर्षाने दिसू लागला. डॉ. जून सिंगर या विश्लेषक मानसशास्त्रा (Analytical - Psychology) च्या प्रख्यात विदुषी. १९७७ साली त्यांनी Androgyny : Towards a New Theory of Sexuality हा विचारप्रवर्तक ग्रंथ प्रकाशित केला. त्यात पुरुष-प्रकृति आणि 'शिव-शक्ति' या भारतीय संकल्पनेवर एक स्वतंत्र प्रकरण त्यांनी लिहिले आहे. आपल्या या पुस्तकात त्या म्हणतात,

''पाश्च्यात्यांनी प्रशंसिलेली भौतिकवादी मूल्ये आत्मसात करण्यात आज पौर्वात्य आपले श्रम खर्चीत आहेत, अशावेळी पौर्वात्यांच्या महान अलौकिक परंपरांचे जतन करणाऱ्या काही लोकांना आश्रय देण्याचे प्रयत्न अमेरिका करत आहे ही एक उपरोधाची घटना आहे. आशिया खंडाचे प्राचीन वाङमय व संस्कृती ही (व्यवस्थित) ग्रथित व जतन करण्याची जरुरी आहे. ह्या कल्पनेला काही दूरदर्शी लोकांनी (पौर्वात्यांनी) प्रतिसाद दिलेला आहे. त्याचा परिणाम म्हणजे आमच्या देशांत (अमेरिकेत) व आमच्या काळात या (पौर्वात्य) विद्या पुनर्जन्म घेतील. पण हे होण्याकरिता ह्या विद्या ज्यांना अवगत आहेत त्यांनी त्यांचा प्रसार करण्याच्या मार्गासंबंधी (योग्य ती) खबरदारी घेतली पाहिजे. आमच्या (पाश्चात्यांच्या) ज्यूडिओ-ख्रिश्चन परंपरेने आत्म्याचे प्रचंड सामर्थ्य शारीरिक मार्गांनी अनुभवण्याची क्षमता आम्हाला प्रदान केलेली नाही. ह्या (पौर्वात्य) प्रज्ञावंतांनी शिकवलेले शिकण्याची ग्रहणशक्ती अंगात बाळगण्यापूर्वी आम्हाला आपल्या वृत्तीमध्ये व जीवनमार्गामध्ये पुष्कळसे बदल करावे लागतील. ह्या विरोधाचे बुद्ध्या एकात्मीकरण करण्याची जरुरी आहे, ह्याची तर त्यांना (पौर्वात्य प्रज्ञावंतांना) जाणीव आहेच- विशेषतः पुरुषतत्व व स्त्रीतत्व यांचे एकात्मीकरण- पण अशा प्रकारच्या एकात्मीकरणाची प्रक्रिया मनुष्याच्या शरीरात होऊन ते त्यांच्या जीवनात उतरावे ह्याकरिता त्यांनी सुस्पष्ट विधि तयार केले आहेत. हे करताना त्यांनी मन व शरीर यांतील द्वंद्व विसर्जित केले आहे.''

(भाषांतर : पंढरीनाथ प्रभू यांच्या भारतातील शास्त्रांचा उद्‌गम व विकास या पुस्तकातून)

दुर्दैवाने ख्रिस्ती धर्म प्रसारकांनी आपल्या धर्मविचारांची जेवढी हानी केली नाही तेवढी

आज भाषा, अस्मिता यांचा व्यापार करणारे करत आहेत. आपल्या उत्सवांना आपण अक्षरशः रस्त्यावर आणून ठेवलंय. त्यातली भक्ती, कला, श्रद्धा केव्हाच लुप्त झाली आहे. राजकारण्यांनी त्याचे व्यावसायिकरण करुन या सगळ्याचे प्रचंड अवमूल्यन केले आहे. असा धिंगाणा आणि मस्ती म्हणजेच 'धर्मरक्षण' असा एक समज आपल्याकडे आज दृढ झालेला दिसतो. न्यायालयांनी याची दखल घेवून सरकार व पोलीस यांना या धिंगाण्यावर आवर घालण्याची वारंवार विनंती केली. दुर्दैवानी आज या सर्व व्यवस्था एवढ्या भ्रष्ट व सडल्या आहेत, की आपण धर्माच्या नावाखाली विकृतीला प्रोत्साहन देत आहोत याचेही त्यांना भान राहिलेले नाही.

संत, महंत सध्या मोठ्या प्रमाणावर बोकाळले आहेत. राम-रहिम, आसाराबापू यांनी श्रद्धाळूंचा केलेला व्यापार चीड आणणारा आहे. धर्माच्या मूळ संकल्पनेशी आपण केव्हाच फारकत घेतली आहे. आपल्या इतक्या जयंत्या आणि पुण्यतिथ्या जगात कुठेच साजऱ्या होत नाहीत.

भारतीय 'धर्म' संकल्पनेत पंथ, संप्रदाय मानणारे, आणि झिडकारणारे या सगळ्यांचा अंतर्भाव आहे. अशा सर्व समावेशक संकल्पनेला 'निधर्मी' करणे आत्मघातकी आणि हास्यास्पद आहे. अशा जीवन दिग्दर्शक धर्मातील विचारतत्त्वापासून समाजाला निवृत्त केले की आजच्या सारखा दिशाहीन, गोंधळलेला, कायम असंतुष्ट, मतलबी समाज निर्माण होतो.

स्मृतिभ्रंशा इतकेच, स्मृतीरंजन ही धोकादायक असते. जीवनात वेड्यावाकड्या वळणांची दाहकता कमी करायची असेल तर निदान सामान्य माणसाला तरी श्रद्धेची गरज असते.

म्हणूनच अशा अतिस्मृतिरंजन करणाऱ्या व श्रद्धेचा व्यापार करणाऱ्यांपासून धर्माचे रक्षण होणे गरजेचे आहे.

•••

ज्या अंकावर वार्षिक देणगीबाबत चिठ्ठी आहे त्यांनी तपशीलासाठी एप्रिल २०१८ अंकाचे पान २८ पहावे ही विनंती.

•••••••••

एप्रिल २०१८ अंकापासून पत्ते छपाईच्या संगणकीय प्रणालीतीत केलेल्या बदलातील तांत्रिक चुकीमुळे सुमारे १७५ ते २०० अंक पोष्टाकडुन परत आले होते. त्या सर्वांना एप्रिल १८ व जुलै १८ हे दोन्ही अंक एकत्र पाठविले आहेत, याची देणगीदारांनी नोंद घ्यावी. आपल्याला झालेल्या गैरसोईबद्दल दिलगिरी व क्षमस्व.

**– कार्यकारी विश्वस्त**

**संपादक** : डॉ. विजय वासुदेव बेडेकर
**प्रकाशक व मुद्रक** : अनंत विनायक धोरे, लक्ष्मी केशव कार्यालय, प्रताप सिनेमासमोर, कोलबाड, ठाणे - ४०० ६०१
**मुद्रणस्थळ** : परफेक्ट प्रिन्टस्, नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे - ४०० ६०१